# नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक
NAVAKAL

• पुणे, शुक्रवार २२ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४२, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 242 Marathi - Daily - Pune, 22 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
टेट्रा पॅकमध्ये ज्यूस आहे की दारू?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


## थोडक्यात...

### विधान परिषद निवडणुकीसाठी उबाठाची मातोश्रीवर आज बैठक

**मुंबई** - विधान परिषद निवडणुकीआधी उबाठात संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे. मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उद्या मुंबईतील मातोश्री निवासस्थानी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत आगामी निवडणुकांची रणनीती, पक्ष संघटनेची स्थिती तसेच मराठवाड्यातील राजकीय परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.
विधान परिषद निवडणूक जवळ आल्याने सर्वच राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर उबाठा गटाची ही बैठक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. पक्षाच्या दृष्टीने मराठवाडा हा महत्त्वाचा राजकीय पट मानला जातो. त्यामुळे या विभागातील जिल्हाप्रमुख, संपर्कप्रमुख, उपजिल्हाप्रमुख तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकाऱ्यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. आगामी विधान परिषद निवडणुकीत पक्षाची भूमिका, संभाव्य उमेदवारी, स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे आणि संघटनात्मक मजबुती यावर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

# दोन दिवसांत दीड कोटी तरुणाईने तुफान प्रतिसाद देताच ‘कॉकरोच जनता पार्टी’चे अकाऊंट भारतात बंद केले

## संतापाची लाट

**बेरोजगार, आळशी तरुण झुरळाप्रमाणे संस्थांवर हल्ला करतात असे वक्तव्य भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केले असल्याचे वृत्त पसरले आणि तरुणाई भडकली. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी लगेचच आपण त्या अर्थाने बोललो नव्हतो असे स्पष्ट केले. मात्र तोपर्यंत ‘झुरळ’ अर्थात कॉकरोच ट्रेंडिंग झाले. त्यातूनच अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या अभिजित दिपके याने माणसाला झुरळाचा चेहरा लावून एक्स अकाऊंटवर ‘कॉकरोच जनता पार्टी’ सुरू केली आणि म्हणता म्हणता दोन दिवसांत दीड कोटी भारतीय त्याचे सभासद झाले. या पार्टीने भाजपाला मागे टाकले. आता अभिजित ही चळवळ पुढे कशी नेतो यावर सर्व स्तरात उत्सुकता असतानाच एक्स वरील त्याचे अकाऊंट बंद करण्यात आले. यामुळे तरुणाई अधिकच संतापली असून, अभिजितने तातडीने सुरू केलेले ‘कॉकरोच इज बॅक’ या अकाऊंटवर उड्या पडल्या.**




### ‘कॉकरोच पार्टी’चा जाहीरनामा

कॉकरोच पार्टी जाहीरनामा सध्या चर्चेत असून, न्यायव्यवस्था, निवडणूक प्रक्रिया, महिला सक्षमीकरण, माध्यम स्वातंत्र्य आणि पक्षांतर यांसारख्या मुद्यांवर आक्रमक भूमिका घेणार आहे. महिलांसाठी संसदेत ५० टक्के आरक्षण आणि केंद्र-राज्य मंत्रिमंडळातही महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. पक्षांतर रोखण्यासाठी पक्ष बदलणाऱ्या आमदार-खासदारांना २० वर्षे निवडणूक लढवण्यास व सार्वजनिक पद धारण करण्यास बंदी घालण्याचा प्रस्ताव आहे. माध्यम स्वातंत्र्याच्या मुद्यावर अंबानी आणि अदानी समूहांच्या माध्यम संस्थांचे परवाने रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून, काही पत्रकारांच्या बँक खात्यांची चौकशी करण्याचीही भूमिका मांडली आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी मतदानाचा हक्क हिरावून घेणे हा गंभीर गुन्हा ठरवण्याचा प्रस्ताव आहे. सरन्यायाधीशांना निवृत्तीनंतर कोणतेही राजकीय पद किंवा लाभ देऊ नये, अशी मागणीही जाहीरनाम्यात करण्यात आली आहे.

■ मुंबई

**मूळचा** हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी येथील मराठी तरुण अभिजित दीपके म्हणाला की, आम्ही काही नियोजन करून हा पक्ष स्थापन केलेला नाही, ही एक अपघाताने निर्माण झालेली डिजिटल चळवळ आहे. पक्षाचे घोषवाक्य ‘धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाहीवादी, आळशी’ असे ठेवण्यात आले. https://cockroachjantaparty.org/join या लिंकच्या माध्यमातून त्यांनी सदस्य होण्याचे आवाहन युवकांना केले. वाढत्या लोकप्रियतेच्या पार्श्वभूमीवर अचानक ‘कॉकरोच जनता पार्टी’चे अधिकृत ‘एक्स’ अकाऊंट भारतात ब्लॉक करण्यात आले. अकाऊंटवर ‘अकाऊंट विथहेल्ड’ असा संदेश दिसू लागला आणि त्यावरील » पान ७ वर

# रेल्वे भरतीसाठी आलेल्या परप्रांतीयांना मारहाण

## मात्र राज ठाकरे निर्दोष मुक्त



**२००८ मधील रेल्वे भरती आंदोलन व परप्रांतीयांना मारहाण केल्याच्या प्रकरणात ठाणे न्यायालयाने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणात पोलिसांनी पुरावा सादर करण्यात कसूर केल्याने राज ठाकरेंसह सातही आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता झाली आहे. सगळेच निर्दोष असतील तर परप्रांतीय उमेदवारांवर हल्ला नेमका कोणी केला, हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतच राहिला आहे.**

■ ठाणे

**या निकालाबाबत** बोलताना राज ठाकरे यांचे वकील म्हणाले की, आरोपी क्रमांक १ ते ७ यांच्यावर उत्तर भारतीय उमेदवारांना मारहाण

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

केल्याचा आरोप होता. मात्र त्यांच्याविरोधात ठोस आणि सबळ पुरावे न्यायालयात सादर करण्यात अपयश आले. केवळ ओळखपत्र सापडल्याच्या आधारावर कोणाला मनसे कार्यकर्ता म्हणता येणार नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले. राज ठाकरे यांच्याविरोधात मुख्य आरोप होता की, त्यांच्या कथित चिथावणीखोर भाषणामुळेच हा हिंसाचार घडला. मात्र, हे सिद्ध करण्यासाठी सादर करण्यात आलेली सीडी न्यायालयाने ग्राह्य धरली नाही. कारण त्या डिजिटल पुराव्यासोबत आवश्यक असलेले ६५ बी प्रमाणपत्र सादर करण्यात आले नव्हते. त्यामुळे » पान ७ वर

# राष्ट्रवादी आमदार शिवसेनेच्या संपर्कात आमदार संजय शिरसाट यांचा दावा

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसमध्ये गेले काही दिवस सुरू असलेल्या नेतृत्वाच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आज शिंदेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी एक दावा करून खळबळ उडवून दिली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणाचे नेतृत्व स्वीकारायचे, यावरून संभ्रम निर्माण झाला असून, अनेक आमदार आमच्या संपर्कात आहेत, असे शिरसाट यांनी सांगितले. मात्र शिरसाट यांचा हा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आमदार उमेश पाटील यांनी फेटाळून लावला.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मुद्यावरून सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल अस्वस्थ असल्याची चर्चा गेले काही दिवस सुरू होती. त्यातच तटकरे आणि पटेल यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने राष्ट्रवादीचे २२ आमदार शरद पवार गटात जाणार, अशी चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना शिरसाट म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परिस्थिती मुळीच आलबेल नाही. पक्षात सध्या नेतृत्वावरून संभ्रम असून, त्यांचे काही आमदार आमच्या संपर्कात आहेत. राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी हे सर्व दावे फेटाळून लावले.

# शाईफेक झालेले विकास लवांडे वाघोली पोलिसांच्या ताब्यात

■ पुणे

**काही** दिवसांपूर्वी शाईफेक झालेले शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना आज वाघोली पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र खोट्या फिर्यादीवरून मला अटक केली असल्याचा आरोप लवांडे यांनी सोशल मीडियावरून केला. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षाचे नेते रोहित पवारही वाघोली पोलीस ठाण्यात आले. सुप्रिया सुळे यांनी अटकेचा निषेध केला. या दरम्यान पुणे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले की, लवांडे यांना केवळ ताब्यात घेतले आहे. त्यांना अटक केलेली नाही. पोलीस जेव्हा लवांडे यांना गाडीतून पोलीस ठाण्यात घेऊन जात होते तेव्हा त्यांनी एक्सवर आरोप केले की, पुणे पोलिसांची चोर सोडून संन्याशाला फाशी.. माझ्यावर जीवघेणा हल्ला करणारे गुंड संग्राम भंडारे व इतर सर्व आरोपी मोकाट आहे. वाघोली पोलीस खोट्या फिर्यादीवरून पुरावा नसताना मला अटक करण्यासाठी मला फोन न करता रात्री घरी आले. मी घरी नव्हतो.

# नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. शिरुरेंना अटक

■ पुणे

**देशभरात** खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आज पहिल्यांदाच एका पालकाला अटक केली आहे. लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांनी स्वतःच्या मुलाला परीक्षेत फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी आरोपी शिवराज मोटेगावकरकडून प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. डॉ. मनोज शिरुरे यांना लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणल्यानंतर सीबीआयने अनेक तासांच्या चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली.
डॉ. मनोज शिरुरे हे लातूरमधील जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालयाचे संचालक आहेत. सीबीआयचे पथक रविवारपासून लातूरमध्ये तळ ठोकून असून, मोटेगावकरच्या संपर्कातील सर्व संशयितांची चौकशी सुरू आहे. शिरुरे यांच्या रुग्णालयात पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी साडेचार तास तपास केला. या दरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात » पान ७ वर

# गरीबनगर तोडमोहीम सुरूच दगडफेक प्रकरणी १६ अटकेत

■ मुंबई

**वांद्रे** पूर्व येथील गरीब नगर झोपडपट्टी परिसरात रेल्वेच्या जागेवरील अतिक्रमण हटाव मोहीम आज सलग तिसऱ्या दिवशीही सुरू होती. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सुरू झालेल्या या कारवाईत कालपर्यंत सुमारे ६० टक्के अतिक्रमण हटवण्यात आले असून, उर्वरित ४० टक्के भागावर आज बुलडोझर चालवण्यात आले. दरम्यान, काल झालेल्या दगडफेक प्रकरणी १६ जणांना अटक करण्यात आली आहे.

काल कारवाईदरम्यान स्थानिक नागरिक आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण करत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत पाच पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले



झाला होता. संतप्त जमावाने पोलिसांवर दगडफेक केल्याने परिस्थिती बिघडली होती. यानंतर पोलिसांनी लाठीमार असून, त्यांच्यावर जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दगडफेक प्रकरणात » पान ७ वर

# जातनिहाय जनगणना विरोधी याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने आगामी जनगणनेमध्ये जातनिहाय आकडेवारी गोळा करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने स्पष्ट केले की, हा पूर्णपणे सरकारचा धोरणात्मक निर्णय असून, कल्याणकारी योजना आखण्यासाठी मागासवर्गीयांची अचूक संख्या सरकारला माहीत असणे आवश्यक आहे.
यासंदर्भात सुधाकर गुम्मुला यांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने म्हटले की, मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना राबवायच्या असतील, तर सरकारला त्यांच्या लोकसंख्येची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. जनगणना जात-आधारित असावी की, नाही, हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील विषय नसून तो सरकारच्या धोरणात्मक निर्णयाचा भाग आहे. यात चुकीचे काही नाही.

# दिलेली आश्वासने तातडीने पूर्ण करा! एसटी कामगारांचा आंदोलनाचा इशारा

■ मुंबई

**महायुती** सरकारने वेतनवाढ, महागाई भत्ता आणि थकबाकीसह विविध मागण्यांबाबत सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने केला आहे. प्रलंबित मागण्या तातडीने निकाली काढल्या नाहीत, तर एसटीचे मध्यवर्ती कार्यालय, विभागीय कार्यालये आणि मध्यवर्ती कार्यशाळांवर धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा समितीने सरकारला दिला आहे.
एसटी कामगारांच्या विविध आर्थिक मागण्यांबाबत गेल्या वर्षी १३ ऑक्टोबर रोजी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत संयुक्त कृती समितीची बैठक पार पडली होती. या बैठकीत एप्रिल २०२० ते मार्च २०२४ या कालावधीतील कामगारांच्या मूळ वेतनात ६,५०० रुपयांची वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार, वेतनवाढीच्या थकबाकीचे ४८ हप्ते डिसेंबर २०२५ च्या वेतनापासून देण्यास सुरुवात करण्यात आली. उर्वरित हप्त्यांची संख्या कमी करणे तसेच इतर प्रलंबित आर्थिक मागण्यांवर तीन महिन्यांत बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन सरकारने दिले होते.

# मराठा आरक्षणावर चर्चेची तयारी प्रसाद लाड आज जरांगेंना भेटणार?

■ जालना

**मराठा** आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी ३० मेपासून आमरण उपोषण करण्याची घोषणा



केली आहे. आंदोलनापूर्वी सरकारला चर्चेची संधी देत त्यांनी भाजपा आमदार प्रसाद लाड यांना अंतरवाली सराटी येथे चर्चेसाठी येण्याचे जाहीर निमंत्रण दिले आहे. त्याला प्रतिसाद देत प्रसाद लाड हे उद्या अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेण्याची शक्यता आहे.
प्रसाद लाड यांनी अलीकडेच सरकार मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून, चर्चेतून मार्ग काढू, असे विधान केले होते. त्यानंतर जरांगे-पाटील यांनी त्यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत चर्चेसाठी पुढाकार घेतला. याबाबत बोलताना मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, मी कधीच स्वतःहून कोणाला चर्चेसाठी निमंत्रण देत नाही. प्रसाद लाड यांच्या बोलण्यात आपुलकी आणि माया दिसून आली. तसेच मुख्यमंत्र्यांकडून शंभर टक्के मागण्या मान्य करून घेऊ, असा शब्द त्यांनी दिला.

# वरळी, वांद्रे, अंधेरी समूह पुनर्विकास सगळीकडे अदानी, अंबानींची बोली

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत आदर्श नगर-वरळी, वांद्रे रेक्लेमेशन आणि एस.व्ही.पी. नगर, अंधेरी (पश्चिम) येथील समूह पुनर्विकास प्रकल्पांसाठी बांधकाम व विकास संस्था नियुक्त करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदांच्या तांत्रिक बोली उघडण्यात आल्या आहेत. यात तीनही ठिकाणी अदानी व अंबानी यांनी बोली लावली आहे.**

■ मुंबई

**म्हाडाच्या** मुंबई मंडळातर्फे मुंबईतील तीन महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी म्हणजे अंधेरी पश्चिम येथील सरदार वल्लभभाई पटेल नगर (७३.८९ एकर), वांद्रे येथील वांद्रे रेक्लेमेशन (९८.२७ एकर) आणि वरळीतील आदर्शनगर (३४.३३ एकर) या समूह पुनर्विकास प्रकल्पांसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यानुसार या निविदा उघडण्यात आल्या.
यामध्ये आदर्श नगर-वरळी प्रकल्पासाठी अदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड आणि जे. एस. डब्ल्यू रिअल्टी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी तांत्रिक बोली सादर केल्या आहेत. वांद्रे रेक्लेमेशन



प्रकल्पासाठी लोढा डेव्हलपर्स लिमिटेड, अदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड आणि जे. एस. डब्ल्यू रिअल्टी अँड » पान ७ वर

# गंगेवर आणखी एकाही विद्युत प्रकल्पाला मंजुरी देणार नाही

■ नवी दिल्ली

**गंगा** नदीचे भौगोलिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व पाहता यापुढे उत्तराखंडमध्ये गंगेच्या पात्रावर एकाही जल विद्युत प्रकल्पाला मंजुरी दिली जाणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्रावर दिली आहे.
केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त महाअधिवक्ता ऐश्वर्या भाटी यांनी हे शपथपत्र न्यायालयात दाखल केले. गंगा नदीला भारतात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे गंगा नदीच्या संरक्षणासाठी सरकार विशेष महत्त्व देत आहे. गंगा नदीवर उभारल्या जाणाऱ्या जल विद्युत प्रकल्पामधून होणाऱ्या लाभापेक्षा पर्यावरणाची हानी कितीतरी पटीने होते. त्यामुळे गंगा नदीवर सध्या सुरू असलेल्या ७ जल विद्युत प्रकल्पांव्यतिरिक्त एकाही प्रकल्पाला यापुढे मंजुरी दिली जाणार नाही. या ७ प्रकल्पांपैकी ४

## केंद्राची सुप्रीम कोर्टात ग्वाही

प्रकल्प एव्हाना सुरू झाले आहेत. तर उर्वरित ३ प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. अलकनंदा व भागिरथी या गंगेच्या उपनद्या गंगेची जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका निभावतात. त्यामुळे या नद्यांवरही यापुढे जल विद्युत प्रकल्पांना मंजुरी दिली जाणार नाही, असे या शपथपत्रामध्ये म्हटले आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial


# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

महानगर गॅसच्या मीटर रीडिंगसाठी (बाईकर) पाहिजेत. पगार 22,000/- + 3,000/- TA, दिव्यम एक्सप्रेस **9820385767/ 7208993036** {NC260571}

10/12 तास होम पेशंट ड्यूटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला पर डे. **9372767739 / 8452061740** {NC260614}

पेस्ट कंट्रोल कंपनी डोंबिवली मुंबई, ठाणे, विरार, करिता ऑपरेटर पाहिजे. राहण्याची व्यवस्था, बाईक आणणाऱ्याला प्राधान्य : **9323682041** आकर्षक वेतन+ PF + Gratuity {NC260618}

चेंबुर टूर्स ऑफीससाठी कॉलिंग लेडी स्टाफ पाहिजे पगार, incentive **9594503777** {NC260629}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

घाटकोपरमध्ये पार्ट टाईम ड्रायव्हर पाहिजे. 9.30 ते 2.30. पगार- 10k. **9819439898** {NC260640}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटर :**9819426634/ 9969529162** {NC260638}

स्क्रीन पेंटर/ हेल्पर पाहिजेत लेडीज/ जेंटस, जरीमरी मुंबई. **9930775033/ 9820811141** {NC260615}

कॉटनग्रीनमध्ये प्रिन्टिंग फर्मकरिता त्वरीत पाहिजेतः (१) अनुभवी ACCOUNTANT (टेली, टॅक्सेशन तसेच फायनलाइझेशनपर्यंत जाणणारे) आणि (२) ग्राफीक डिझाइनर (अनुभवी) संपर्कः **7977798755.** {NC260589}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

## पाहिजेत

लोअर परेल, प्रिंटिंग प्रेसमध्ये पंचिंग ऑपरेटर त्वरित पाहिजे. पंचिंग ऑपरेटर पगार = १८०००-२२०००. संपर्क- **9320307848/ 9653179228** {NC260592}

इलेक्ट्रिकल कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 15000 ते 22000 गाडीभाडे मिळेल. **9820432870/ 9819017461** {NC260561}

गोरेगाव पूर्व येथे व्हेज/ नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी कर्मचारी पाहिजेत हेड शेफ, सेमी किचन हेल्पर, पॅकींग स्टाफ, किचन हेल्पर, कॅप्टन/मॅनेजर, टेबल क्लिनर, एक्झिक्युटिव्ह शेफ, डिलिव्हरी बॉय ब्रेड्स मेकर. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. संपर्कः **9833119998** {NC260570}

**भिवंडी येथे ऑफसेट प्रिंटींग मशीनवर काम करण्यासाठी बॉयलर (हेल्पर) पाहीजेत. कल्याण स्टेशनवरून कंपनीची येण्यासाठी - जाण्यासाठी कंपनीची गाडीची व्यवस्था आहे.**
संपर्क
**9224455770**

लोअर परेल/चिंचपोकळी येथे ई-बाईकवर डिलीव्हरीसाठी (पगार 18000 पर्यंत) आणि गोडाऊनमध्ये कामासाठी मुले (पगार 13 ते 14000) पाहिजेत. संपर्कः **9320064643** किंवा व्हॉट्सॲप क्रमांक **8080084843** वर Hi पाठवा {NC260601}

सोसायटी मध्ये हाऊसकीपिंगसाठी मुले पाहिजे चिंचपोकळी, कॉटनग्रीन संपर्क **9699927271** {NC260625}

अनुभवी सिक्युरिटी गार्ड (पुरुष/ महिला), सुपरवायझर, फील्ड ऑफीसर (बाईक असलेल्यांना प्राधान्य) व व्हॅलेट पाहिजेत. वय ४० वर्षपिक्षा कमी तसेच किमान उंची ५ फूट ७ इंच असावी. ८ तास ड्युटी. कामाचे ठिकाणः कांदिवली व अंधेरी. संपर्कः **9594871694/ 9821406617** {NC260633}

## पाहिजेत

नामांकित कंपनीमध्ये हेल्थकेअर सर्वे/प्रमोशनसाठी दहावी ते पदवीधर मुली/स्त्रिया पाहिजेत. फिक्स पगार - १५०००/- कांजुरमार्ग- **7302037159/ 9223222843** {NC260644}

डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी कामगार पाहिजे. मरोळ, अंधेरी येथे संपर्कः **9892934566** {NC260611}

जोगेश्वरीस्थित AV कंपनीला फ्रेशर/ अनुभवी टेक्निशियन (ITI/ DIPLOMA) मुले पाहिजेत. संपर्क V- Tech- **9167252541** {NC260646}

विलेपार्ले ते भिवंडी रोज जाण्यासाठी-येण्यासाठी कार ड्राईव्हर पाहिजेत. (विलेपार्ले जवळ राहणाऱ्यांना प्राधान्य). संपर्कः **9224455770** {NC260623}

पंचिंग ऑपरेटर/ बाइंडिंग हेल्पर, (महिला/पुरुष) कामासाठी पाहिजे. घाटकोपर (प.) संपर्क- **9167242621/ 9167242625** सकाळी १० ते संध्याकाळी ७.३० पर्यंत कॉल करा {NC260645}

सरकारमान्य कंपनीत रिटायर्ड अधिकारी/ सुशिक्षित गृहिणी पाहिजेत. (वय ३० ते ७०), पगार + ईतर भत्ते. (लिमिटेड सीट). **9820683569** {NC260643}

## Situation Vacant

Graduate Staff required for back office Bandra location. Contact- **8693809962** {NC260593}

WANTED FOR SMALL ENGINEERING UNIT IN BHAYANDAR TURNER FITTER, MACHINISTS & HELPER. SALARY AS PER EXPERIENCE- **9820280495** {NC260642}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9136034519 / 8369152017** {NC260495}



# 'शोले' या सुपरहिट चित्रपटाचे एडिटर
# एम. एस. शिंदे

**आय.एस.जोहर या विनोदी अभिनेता, निर्माता-दिग्दर्शकाने आपल्या 'बेवकूप'या १९६० मधील चित्रपटातून माधव शिंदे या तरुणाला संकलनाची पहिली संधी दिली आणि बघता बघता माधवचा महान संकलक एम.एस.शिंदे म्हणून प्रवास सुरू झाला.**

संजीव वेलणकर, पुणे

**जी.पी.** सिप्पी यांच्या चित्रपट संस्थेत महिना २००० रुपये वेतनावर एम. एस. शिंदे काम करीत असत. दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी 'शोले' चित्रपट शुटिंग करून पूर्ण केला. पूर्ण केलेल्या निगेटिव्ह फिल्मची लांबी होती ३ लाख फूट. या फिल्मचा एवढा मोठ्या ढिगाऱ्यातून चित्रपटासाठी फक्त १६ ते १८ हजार फूट वेगळे करायचे होते. बापरे!!!!! किती किचकट आणि अवघड काम असेल ते पहिल्या आवृत्तीत शिंदे यांनी २१ हजार फुटाची फिल्म यातून वेगळी काढली आणि सेन्सार बोर्डाला पाठविली. सेन्सारने मग यात अनेक कट सुचविले आणि अंतिमतः १८ हजार फुटाची फिल्म तयार झाली. ३ तास आणि २० मिनिटे इतक्या प्रदीर्घ लांबीचा चित्रपट या अफाट संकलकाने अत्यंत कुशलतेने तयार केला.

या 'शोले' चित्रपटाला फिल्मफेअर पुरस्कारासाठी अनेक नामांकने मिळाली. मात्र, प्रत्यक्षात केवळ एम. एस. शिंदे यांनाच उत्कृष्ट संकलनाचा पुरस्कार मिळाला होता. १९८६ मधील दूरदर्शनवरील 'बुनियाद' ही मालिका देखील एम.एस. शिंदे यांनी संकलित केली होती. एम. एस. शिंदे यांना महाराष्ट्र सरकारतर्फे जीवनगौरव पुरस्कार मिळाला होता. एम.एस.शिंदे यांचे २८ सप्टेंबर २०१२ रोजी निधन झाले.



# विचारपूस करण्यासाठीच शरद पवारांची भेट! तटकरेंची सारवासारव

■ मुंबई

**शरद** पवार यांची भेट त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठीच घेतली. या भेटीत कसलीही राजकीय चर्चा झाली नाही, असे स्पष्टीकरण देत आज सुनील तटकरे यांनी माध्यमांमध्ये सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वेगवान घडामोडी घडल्या. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तेव्हापासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या मुद्द्यावरून जोरदार संघर्ष सुरू असल्याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू झाली. पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांना डावलले जात असल्याने ते नाराज आहेत, असे बोलले जात होते. त्यातच तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने चर्चेला ऊत आला होता. या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी आज राजधानी दिल्ली येथे पत्रकार परिषद आयोजित करत आपली भूमिका मांडली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू असल्याचे वृत्त धादांत खोटे आहे. ते म्हणाले की, शरद पवार यांच्याशी माझी गेली तीन वर्षे भेट झाली नव्हती. हल्ली त्यांना वारंवार ब्रीच कँडीमध्ये दाखल करावे लागले होते.

# जळगावमध्ये ३ वर्षीय चिमुकलीवर ७८ वर्षीय वृद्धाकडून अत्याचार

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात तीन वर्षांच्या चिमुकलीसोबत लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी ७८ वर्षीय वृद्धाविरोधात चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात विनयभंग, पोक्सो तसेच ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पीडित चिमुकली घराजवळ खेळत असताना आरोपी वृद्धाने तिच्यासोबत अश्लील वर्तन केले. यावेळी घाबरलेल्या चिमुकलीने रडण्यास सुरुवात केली. तिचा आवाज ऐकून आई घराबाहेर आली असता हा प्रकार उघडकीस आला. यानंतर पीडित मुलीच्या आईने तातडीने चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. आरोपीवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी संतप्त ग्रामस्थांनी बैलगाड्या रस्त्यावर उभ्या करून चाळीसगाव-नागद मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले.

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# विरार दगडखाणीत प्राणघातक हल्ला मानवाधिकार आयोगाने अहवाल मागवला

■ विरार

**विरारमधील** दगडखाणीची पाहणी करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकावर हल्ला झाल्याच्या घटनेची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने घेतली आहे. याप्रकरणी पोलीस महासंचालक आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांना दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

१२ मे रोजी विरार येथील गडगापाडा मध्ये असलेल्या एका दगडखाणीची पाहणी करण्यासाठी मंडळ अधिकारी गेले होते. या दगडखाणीत बेकायदेशीर उत्खनन होत असल्याची तक्रार होती. त्यावेळी दगडखाण मालकाने हल्ला केला होता. या हल्ल्यात मंडळ अधिकारी प्रभाकर पाटील जखमी झाले होते तर सामाजिक कार्यकर्ते आत्माराम पाटील यांचा मृत्यू झाला होता. या संदर्भात माध्यमात आलेल्या बातम्यांची दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक आणि पालघर जिल्हाधिकारी यांना या प्रकरणाचा सविस्तर अहवाल १४ दिवसांत सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि नागरिकांवर असा हल्ला होणे अत्यंत चिंताजनक आहे. हा थेट मानवाधिकारांचे आणि कायदा-सुव्यवस्थेचे उल्लंघन आहे, असे आयोगाने या नोटिशीत म्हटले आहे.

# बनावट जन्म-मृत्यू दाखला प्रकरणी गुन्हे दाखल करा! काँग्रेसची मागणी

■ भाईंदर

**बनावट** जन्म दाखला प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करावे. तसेच १,५०० संशयित दाखल्यांच्या नावांची यादी जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन यांनी केली आहे.

मिरा-भाईंदर शहरात बनावट जन्म व मृत्यू दाखल्यांचे प्रकरण समोर आले आहे. पालिकेतून संशयास्पद दाखले जारी केल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. याप्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी संबंधित संशयित दाखल्यांची संपूर्ण माहिती पोलिसांकडे सुपूर्द करून रितसर तक्रार करावी. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावे. तसेच संशयित नावांची यादी सार्वजनिक करावे, अशी मागणी काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन यांनी केली आहे. यामुळे खोटे दस्तऐवज तयार करणे, बेकायदेशीर ओळखपत्रे बनविणे तसेच बोगस मतदानासारख्या गैरप्रकारांना आळा घालण्यास मदत होईल असेहि ते म्हणाले.

# आजचे राशी भविष्य

**शुक्रवार ता. २२ मे २०२६**
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | संयम महत्त्वाचा ठरेल. शांतचित्ताने वाटचाल करा. मन रमवण्याचा प्रयत्न करा. |
| वृषभ | कामानिमित्त जवळच्या प्रवासाचे योग. प्रवासातून फायदा होईल. बोलण्याने इतरांची मने जिंकाल. |
| मिथुन | शांतचित्ताने दिवस व्यतीत करा. टोकाची भूमिका घेणे टाळा. कामाचा ताण येईल. |
| कर्क | अडथळ्यांवर मात करावी लागेल. अनावश्यक चिंता टाळा. प्रवासात खिसापाकीट सांभाळा. |
| सिंह | अप्रिय परिस्थितीला सामोरे जावे लागेल. खर्चात वाढ होईल. पैसा वायफळ जाण्याची शक्यता. |
| कन्या | इच्छापूर्तीचा दिवस. मनोरंजनाचा आनंद घेता येईल. जोडीदाराचा जोरदार पाठिंबा मिळेल. |
| तूळ | उत्साहवर्धक दिवस. प्रगतीच्या अनेक नवीन संधी येतील. कौटुंबिक शुभकार्यासाठी खर्च संभवतो. |
| वृश्चिक | आत्मविश्वासाचा अभाव प्रगतीत अडथळा ठरेल. सकारात्मकता आणि खुल्या वृत्तीने मोठी कामेही साध्य करता येतील. |
| धनु | कामाची दगदग होईल. चुका टाळा. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. घरखर्चात वाढ होईल. |
| मकर | फायदेशीर दिवस. काही महत्त्वाचे निर्णय घेता येतील. कामाचे श्रेय मिळेल. |
| कुंभ | अनुकूल दिवस. सर्वकाही सुरळीत व सहज पार पडेल. पैशाचा ओघ उत्तम असेल. |
| मीन | रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. ताणतणावापासून दूर राहा. अनाठायी खर्चाची शक्यता. |

## महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

सोडत दर गुरुवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 21 | सोडत दिनांक 21/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AP-00 : 4510**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **4510** — रुखमणी एन्टरप्रायझेस - औरंगाबाद; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **6369** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (2 बक्षिसे)

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3412 | 3980 | 4121 | 4199 | 4704 | 6074 | 7366 | 7988 | 9526 | 9546 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0868 | 1521 | 3263 | 4104 | 4753 | 6517 | 6564 | 7865 | 8475 | 8697 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1449 | 3179 | 4554 | 4682 | 5537 | 6607 | 7260 | 9038 | 9675 | 9786 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1838 | 2386 | 4578 | 4586 | 5229 | 7320 | 8045 | 8474 | 8611 | 9775 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1139 | 1815 | 2506 | 3140 | 3800 | 4640 | 5471 | 6189 | 6970 | 7774 | 8638 | 9443 |
| | | 1140 | 1861 | 2514 | 3159 | 3814 | 4682 | 5502 | 6206 | 7023 | 7775 | 8683 | 9446 |
| | | 1149 | 1867 | 2516 | 3181 | 3818 | 4687 | 5508 | 6210 | 7030 | 7782 | 8686 | 9456 |
| | | 1154 | 1901 | 2527 | 3188 | 3839 | 4694 | 5529 | 6266 | 7051 | 7792 | 8739 | 9458 |
| | | 1175 | 1941 | 2576 | 3206 | 3843 | 4707 | 5535 | 6286 | 7055 | 7799 | 8758 | 9489 |
| 0001 | 0488 | 1176 | 2002 | 2602 | 3207 | 3853 | 4714 | 5536 | 6298 | 7097 | 7801 | 8764 | 9498 |
| 0008 | 0500 | 1182 | 2032 | 2605 | 3253 | 3903 | 4729 | 5547 | 6335 | 7111 | 7803 | 8823 | 9536 |
| 0020 | 0530 | 1184 | 2038 | 2613 | 3259 | 3910 | 4749 | 5554 | 6337 | 7216 | 7827 | 8829 | 9559 |
| 0024 | 0532 | 1191 | 2071 | 2620 | 3273 | 3913 | 4756 | 5564 | 6346 | 7246 | 7840 | 8848 | 9569 |
| 0037 | 0537 | 1208 | 2081 | 2625 | 3289 | 3994 | 4759 | 5565 | 6354 | 7260 | 7846 | 8854 | 9589 |
| 0040 | 0550 | 1211 | 2122 | 2627 | 3309 | 4040 | 4783 | 5588 | 6399 | 7270 | 7851 | 8860 | 9592 |
| 0059 | 0572 | 1239 | 2138 | 2654 | 3314 | 4060 | 4791 | 5589 | 6416 | 7277 | 7860 | 8867 | 9615 |
| 0062 | 0574 | 1243 | 2139 | 2698 | 3315 | 4067 | 4800 | 5613 | 6422 | 7286 | 7878 | 8874 | 9616 |
| 0064 | 0580 | 1253 | 2175 | 2714 | 3318 | 4076 | 4841 | 5654 | 6446 | 7315 | 7918 | 8914 | 9629 |
| 0065 | 0606 | 1272 | 2197 | 2721 | 3323 | 4117 | 4866 | 5676 | 6447 | 7334 | 7924 | 8919 | 9632 |
| 0074 | 0610 | 1300 | 2204 | 2727 | 3338 | 4123 | 4877 | 5694 | 6480 | 7367 | 7939 | 8965 | 9636 |
| 0091 | 0615 | 1303 | 2210 | 2762 | 3357 | 4136 | 4966 | 5723 | 6481 | 7403 | 7946 | 9024 | 9694 |
| 0092 | 0652 | 1365 | 2212 | 2772 | 3360 | 4137 | 4967 | 5752 | 6526 | 7406 | 7972 | 9026 | 9697 |
| 0100 | 0700 | 1378 | 2218 | 2775 | 3369 | 4139 | 4984 | 5758 | 6550 | 7413 | 7973 | 9037 | 9707 |
| 0113 | 0707 | 1389 | 2220 | 2784 | 3372 | 4143 | 5018 | 5791 | 6564 | 7443 | 7981 | 9056 | 9709 |
| 0135 | 0718 | 1393 | 2235 | 2812 | 3379 | 4146 | 5029 | 5854 | 6585 | 7447 | 8004 | 9069 | 9747 |
| 0149 | 0723 | 1403 | 2237 | 2823 | 3419 | 4147 | 5042 | 5869 | 6608 | 7458 | 8047 | 9092 | 9748 |
| 0187 | 0733 | 1410 | 2251 | 2829 | 3429 | 4194 | 5114 | 5885 | 6612 | 7463 | 8099 | 9155 | 9758 |
| 0190 | 0744 | 1413 | 2265 | 2851 | 3433 | 4200 | 5115 | 5905 | 6617 | 7479 | 8181 | 9171 | 9792 |
| 0192 | 0748 | 1439 | 2271 | 2903 | 3436 | 4288 | 5125 | 5911 | 6619 | 7490 | 8183 | 9190 | 9809 |
| 0227 | 0792 | 1455 | 2273 | 2913 | 3443 | 4294 | 5127 | 5949 | 6637 | 7527 | 8258 | 9192 | 9819 |
| 0230 | 0803 | 1476 | 2275 | 2925 | 3472 | 4391 | 5182 | 5950 | 6659 | 7573 | 8264 | 9197 | 9825 |
| 0232 | 0830 | 1512 | 2282 | 2930 | 3495 | 4405 | 5200 | 5954 | 6660 | 7588 | 8325 | 9199 | 9859 |
| 0273 | 0834 | 1513 | 2283 | 2938 | 3521 | 4424 | 5204 | 5963 | 6665 | 7617 | 8340 | 9212 | 9891 |
| 0274 | 0840 | 1516 | 2286 | 2952 | 3524 | 4459 | 5227 | 5977 | 6672 | 7631 | 8369 | 9239 | 9894 |
| 0279 | 0942 | 1619 | 2295 | 2962 | 3526 | 4482 | 5242 | 5993 | 6674 | 7647 | 8381 | 9264 | 9935 |
| 0283 | 0976 | 1643 | 2325 | 2982 | 3538 | 4494 | 5301 | 6061 | 6696 | 7664 | 8436 | 9296 | 9938 |
| 0323 | 1015 | 1644 | 2372 | 3017 | 3549 | 4496 | 5325 | 6069 | 6698 | 7701 | 8443 | 9329 | 9949 |
| 0337 | 1041 | 1645 | 2374 | 3037 | 3613 | 4514 | 5353 | 6073 | 6700 | 7702 | 8485 | 9331 | 9961 |
| 0348 | 1049 | 1687 | 2426 | 3065 | 3636 | 4526 | 5370 | 6081 | 6755 | 7713 | 8499 | 9344 | 9968 |
| 0350 | 1063 | 1737 | 2442 | 3075 | 3643 | 4545 | 5399 | 6086 | 6778 | 7718 | 8537 | 9359 | 9969 |
| 0376 | 1110 | 1750 | 2452 | 3081 | 3668 | 4601 | 5411 | 6106 | 6785 | 7727 | 8577 | 9404 | 9974 |
| 0403 | 1111 | 1757 | 2474 | 3105 | 3701 | 4602 | 5415 | 6143 | 6786 | 7731 | 8578 | 9409 | 9983 |
| 0420 | 1118 | 1769 | 2483 | 3107 | 3735 | 4634 | 5464 | 6154 | 6846 | 7733 | 8581 | 9424 | 9991 |
| 0452 | 1137 | 1791 | 2502 | 3134 | 3750 | 4638 | 5467 | 6167 | 6906 | 7743 | 8589 | 9428 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता. २२/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| ८ | ३ | ९ |
| ८१ | २१ | ९१ |
| ७६ | ३६ | ९६ |
| १२५ | १३९ | १८० |
| ४६५ | ६८९ | ५६८ |

# लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता | सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 21/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-08 : 0311**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **9820** — चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **9804** — चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0751 | 1724 | 2310 | 2332 | 2431 | 2791 | 3245 | 3714 | 4742 | 7805 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0772 | 1189 | 2032 | 2442 | 3649 | 4845 | 6422 | 7264 | 8071 | 9463 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0234 | 1939 | 2098 | 2479 | 3676 | 5161 | 5645 | 5910 | 7017 | 8765 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1399 | 2473 | 3359 | 4134 | 5424 | 6364 | 7063 | 8288 | 9219 |
| | | 1465 | 2500 | 3362 | 4186 | 5459 | 6369 | 7088 | 8322 | 9224 |
| | | 1495 | 2521 | 3369 | 4209 | 5513 | 6381 | 7275 | 8378 | 9260 |
| 0007 | 1110 | 1812 | 2527 | 3373 | 4223 | 5558 | 6408 | 7277 | 8529 | 9279 |
| 0008 | 1121 | 1834 | 2561 | 3389 | 4254 | 5566 | 6516 | 7440 | 8553 | 9283 |
| 0052 | 1137 | 1957 | 2562 | 3573 | 4256 | 5569 | 6546 | 7458 | 8680 | 9399 |
| 0063 | 1145 | 1959 | 2682 | 3625 | 4394 | 5577 | 6552 | 7493 | 8721 | 9477 |
| 0064 | 1159 | 1966 | 2715 | 3633 | 4400 | 5687 | 6654 | 7526 | 8745 | 9531 |
| 0140 | 1166 | 2034 | 2733 | 3664 | 4420 | 5693 | 6668 | 7542 | 8778 | 9646 |
| 0308 | 1191 | 2117 | 2949 | 3730 | 4461 | 5745 | 6670 | 7577 | 8806 | 9659 |
| 0319 | 1192 | 2134 | 2982 | 3739 | 4467 | 5752 | 6684 | 7594 | 8808 | 9744 |
| 0340 | 1205 | 2224 | 3012 | 3791 | 4475 | 5757 | 6685 | 7626 | 8829 | 9766 |
| 0424 | 1236 | 2232 | 3023 | 3831 | 4477 | 5766 | 6686 | 7751 | 8864 | 9777 |
| 0490 | 1254 | 2247 | 3030 | 3832 | 4488 | 5820 | 6733 | 7756 | 8877 | 9783 |
| 0513 | 1272 | 2267 | 3131 | 3850 | 4489 | 5989 | 6755 | 7757 | 8885 | 9834 |
| 0559 | 1288 | 2297 | 3132 | 3851 | 4694 | 6008 | 6758 | 7783 | 8984 | 9894 |
| 0704 | 1297 | 2318 | 3138 | 3905 | 4794 | 6015 | 6778 | 7886 | 8986 | 9910 |
| 0748 | 1315 | 2422 | 3225 | 3945 | 4904 | 6019 | 6786 | 8013 | 9141 | 9919 |
| 0803 | 1321 | 2428 | 3280 | 4048 | 4918 | 6039 | 6935 | 8018 | 9157 | 9922 |
| 0804 | 1373 | 2446 | 3344 | 4069 | 5133 | 6061 | 6969 | 8142 | 9159 | 9954 |
| 0910 | 1389 | 2472 | 3347 | 4093 | 5155 | 6063 | 7037 | 8184 | 9196 | 9977 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • दीपलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता | सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 21/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-01 : 2299**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0117 | 0480 | 1664 | 1940 | 3845 | 4830 | 5664 (अंबिका एजन्सी, दादर, मुंबई) | 7957 | 8286 | 9547 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1533 | 1691 | 1799 | 2634 | 3563 | 4905 | 5686 | 7295 | 8278 | 9919 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0406 | 0642 | 3066 | 3275 | 3320 | 3842 | 5257 | 6673 | 9132 | 9370 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0805 | 2288 | 3209 | 4332 | 5485 | 6662 | 8024 | 8981 |
| | 1174 | 2306 | 3325 | 4342 | 5522 | 6670 | 8188 | 9053 |
| 0016 | 1255 | 2321 | 3330 | 4377 | 5540 | 6835 | 8299 | 9159 |
| 0019 | 1416 | 2323 | 3373 | 4472 | 5589 | 6866 | 8438 | 9260 |
| 0026 | 1563 | 2433 | 3450 | 4504 | 5663 | 6893 | 8578 | 9301 |
| 0030 | 1652 | 2564 | 3462 | 4678 | 5695 | 7075 | 8622 | 9358 |
| 0071 | 1863 | 2574 | 3503 | 4748 | 5704 | 7253 | 8682 | 9549 |
| 0088 | 1896 | 2592 | 3583 | 5009 | 5805 | 7279 | 8788 | 9595 |
| 0301 | 2036 | 2812 | 3713 | 5062 | 6137 | 7348 | 8801 | 9697 |
| 0312 | 2187 | 2948 | 3826 | 5168 | 6221 | 7408 | 8821 | 9794 |
| 0383 | 2204 | 3033 | 3885 | 5258 | 6289 | 7564 | 8831 | 9860 |
| 0648 | 2284 | 3099 | 4137 | 5302 | 6605 | 7707 | 8835 | 9927 |
| 0798 | 2285 | 3188 | 4157 | 5374 | 6606 | 7816 | 8929 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# वसई-विरार काँग्रेस जिल्हाध्यक्षपदी कॅप्टन निलेश पेंढारी यांची निवड

■ वसई

**काँग्रेसच्या** वसई-विरार जिल्हाध्यक्षपदी कॅप्टन निलेश पेंढारी यांची मिरा भाईंदर जिल्हा काँग्रेसपदी राकेश राजपुरोहिक यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी पक्षाने प्रस्थापितांना नाकारून तरुण नेत्यांना नेतृत्वाची संधी दिली आहे.

पक्ष बळकट करण्यासाठी काँग्रेस पक्षातर्फे सृजन संघटन अभियानाला राबवण्यात आले होते. या अभियानाअंतर्गत नवीन जिल्हाध्यक्ष तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांची प्रक्रिया राबविण्यात आली. पक्षाचे केंद्रीय निरीक्षक बेल्लाई नाईक यांनी शहरात भेट देऊन कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्याशी चर्चा केली.वसई-विरार जिल्हाध्यक्षपदासाठी २९ इच्छुकांनी अर्ज भरले होते. त्यांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या होत्या. अध्यक्ष निवडीची प्रक्रिया महिनाभर सुरू होती. आज पक्षाने तरुण नेते कॅप्टन निलेश पेंढारी यांची वसई-विरार जिल्हाध्यक्षपदी निवड केली. ही निवड पुढील ५ वर्षांसाठी आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता | सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 21 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 21/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-04 : 7861**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0315 | 1570 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 1654 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | 1969 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 2423 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 3455 | 3705 | 5091 | 5178 | 7452 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0090 | 0396 | 1018 | 1052 | 1273 | 2477 | 3930 | 4781 | 5485 | 7828 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0351 | 2537 | 2723 | 3742 | 4097 | 5222 | 5615 | 6754 | 8489 | 9431 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0412 | 1707 | 1798 | 1934 | 1960 | 3776 | 6566 | 6770 | 8066 | 9236 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1488 | 2333 | 3214 | 3986 | 4946 | 6106 | 6803 | 7430 | 8038 | 8997 |
| | | 1501 | 2392 | 3310 | 4017 | 4966 | 6168 | 6856 | 7431 | 8050 | 9049 |
| 0026 | 0588 | 1578 | 2545 | 3313 | 4047 | 5040 | 6260 | 6860 | 7528 | 8088 | 9081 |
| 0034 | 0591 | 1644 | 2552 | 3318 | 4074 | 5119 | 6333 | 6882 | 7577 | 8177 | 9144 |
| 0035 | 0607 | 1722 | 2567 | 3326 | 4078 | 5135 | 6350 | 6917 | 7632 | 8185 | 9209 |
| 0051 | 0618 | 1821 | 2571 | 3338 | 4273 | 5233 | 6397 | 6934 | 7679 | 8241 | 9229 |
| 0055 | 0713 | 1830 | 2572 | 3357 | 4304 | 5243 | 6454 | 6966 | 7721 | 8282 | 9250 |
| 0080 | 0728 | 1878 | 2672 | 3390 | 4348 | 5267 | 6463 | 7023 | 7725 | 8297 | 9282 |
| 0095 | 0825 | 1913 | 2686 | 3395 | 4413 | 5288 | 6529 | 7050 | 7742 | 8440 | 9309 |
| 0107 | 0845 | 2022 | 2746 | 3396 | 4443 | 5293 | 6554 | 7051 | 7752 | 8458 | 9419 |
| 0110 | 0860 | 2041 | 2758 | 3440 | 4447 | 5315 | 6560 | 7089 | 7758 | 8608 | 9571 |
| 0209 | 0888 | 2075 | 2775 | 3631 | 4473 | 5444 | 6576 | 7107 | 7759 | 8676 | 9578 |
| 0250 | 0905 | 2098 | 2855 | 3635 | 4477 | 5450 | 6610 | 7162 | 7765 | 8682 | 9623 |
| 0261 | 1012 | 2103 | 2870 | 3654 | 4489 | 5501 | 6612 | 7207 | 7776 | 8683 | 9697 |
| 0295 | 1031 | 2122 | 2922 | 3781 | 4490 | 5525 | 6622 | 7259 | 7789 | 8833 | 9836 |
| 0323 | 1127 | 2184 | 2945 | 3806 | 4571 | 5584 | 6662 | 7305 | 7790 | 8845 | 9853 |
| 0413 | 1142 | 2246 | 2987 | 3832 | 4584 | 5657 | 6670 | 7319 | 7795 | 8881 | 9877 |
| 0432 | 1219 | 2247 | 3051 | 3833 | 4634 | 5741 | 6699 | 7334 | 7879 | 8888 | 9909 |
| 0461 | 1243 | 2260 | 3060 | 3861 | 4732 | 5801 | 6715 | 7356 | 7936 | 8889 | 9914 |
| 0489 | 1278 | 2268 | 3096 | 3893 | 4745 | 5805 | 6746 | 7380 | 7971 | 8895 | 9954 |
| 0534 | 1303 | 2317 | 3137 | 3910 | 4845 | 5836 | 6760 | 7420 | 7984 | 8916 | 9957 |
| 0540 | 1444 | 2329 | 3185 | 3929 | 4849 | 6025 | 6762 | 7424 | 8017 | 8951 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# राजीव गांधी यांचा अखेरचा प्रवास

- अमर गोडसे

कोण बोलतंय?

मी गुप्तहेरखात्यातला माणूस आहे.,श्रीपेरूंबुदूरहून बोलतोय. राजीवजींच्या सेक्रेटरीचा गळा आवळल्यासारखा झाला.

राजीवजी कसे आहेत?

पलीकडून कांहीच उत्तर आलं नाही.

अस्वस्थ होऊन राजीवजींच्या सेक्रेटरींनी पुन्हा विचारलं,तुम्ही बोलत का नाही ?....सांगा, कसे आहेत राजीवजी?

सर,ते....ते आता ह्या जगात नाहीत....

> **राजीवजींचे सेक्रेटरी विन्सेंट जॉर्ज राजीवजींच्या खाजगी कचेरीत बसून काम करत होते. त्यांना रात्री साडेदहा वाजता फोन आला. तेव्हा घरची मंडळी झोपलेली होती. एका अडखळत्या आवाजानं त्यांना सांगितलं, सर, बॉम्बहल्ला झालाय.**

पलीकडल्या माणसाने ताबडतोब फोन ठेऊन दिला.

राजीवजींचे सेक्रेटरी हातात फोन धरून तसेच उभे राहिले. आपण काय ऐकलं हे त्यांच्या डोक्यातच शिरत नव्हतं. अफवा खोटी असावी, अशी अंधुक आशा फोन ठेवताक्षणीच विरून गेली कारण फोन पुन्हा खणखणला.

काँग्रेस पक्षाच्या तामिळनाडूमधील एका सदस्यानं तीच बातमी पुन्हा दिली.ताबडतोब बाकीचे फोनही वाजू लागले,तो कर्कश आवाज असह्य होऊन सेक्रेटरी धावत घराबाहेर गेले.

ह्या वेळेपर्यंत एम. ए. फोतेदार आणि सतीश शर्मा; १०,जनपथला पोहचले होते. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी काय घडलं, त्याची माहिती प्रियांकाला दिली. सगळ्यात शेवटी सोनियाजींना ती बातमी कळाली. राजीवजींच्या संदर्भात घडलेल्या धक्कादायक घटनेची बातमी सोनियाजींना सांगण्याची जबाबदारीही अवघ्या एकोणीस वर्षाच्या प्रियांकावर येऊन पडली होती.

राजीवजींच्या बाबतीत घडलेली बातमी ऐकताच विजेचा धक्का बसावा, तशी सोनियाजींची संपूर्ण कायाच आक्रसल्यासारखी झाली.सोनियाजींच्या अंतःकरणाला चिरत, आतून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली.

सात वर्षापूर्वी इंदिराजी हॉस्पिटल मध्ये मृत्यूशय्येवर होत्या, तेव्हा सोनियाजींचे राजीव गांधी यांच्या सोबत झालेलं संभाषण सोनियाजींना आठवू लागलं. त्यावेळी सोनियाजी राजीव गांधी यांना अगदी विनवून सांगत होत्या, की तुझ्या आईचं रिक्त झालेलं पद तू घेऊ नकोस.शेवटी सोनियाजींना वाटणारी भीती प्रत्यक्षात उतरली होती तर!

नाऽऽऽऽऽऽऽही..................

आपल्या एकोणीस वर्षाच्या आयुष्यात आईला एवढं विकल व असाहाय्य झालेलं प्रियांकानं कधीच पाहिलं नव्हतं.

प्रियांकाला सोनियाजींना शांत करता येईना. अचानक सोनियाजी खोकू लागल्या. सोनियाजींचा श्वास एवढा अडकू लागला, की मॅडम आता बेशुद्ध पडतील की काय, अशी सेक्रेटरीला भीती वाटू लागली.

हा दम्याचा अटॅक आहे. प्रियांका म्हणाली.

तो अटॅक इतक्या जोराचा होता की प्रियांका देखील कांहीवेळासाठी घाबरून गेली.

मी आलेच.

प्रियांका सोनियाजींच्या आईच्या खोलीत धावली आणि घाईघाईने इनहेलर आणि दम्याची औषधं शोधू लागली. ती दिवानखाण्यात परतली, तेंव्हा सोनियाजींनी जवळजवळ डोळे फिरवले होते. सोनियाजींचे तोंड उघडत होतं, डोकं मागं लटकत होतं, सोनियाजींना श्वास घ्यायला त्रास होत होता. आई मरतेय की काय, अशी प्रियांकाला भीती वाटली.

प्रियांकाने प्रसंगावधान दाखवून अगदी पटकन सोनियाजींना दम्याची औषधं दिल्याने औषधांचा परिणाम होऊन खोकला थांबला. पण सोनियाजींचे रडणं कांही थांबलं नाही. प्रियांकाने आईला कितीही आवरण्याचा प्रयत्न केला, तरी देखील सोनियाजींना रडं आवरत नव्हतं. समुद्राच्या किनाऱ्यावर एकापाठोपाठ एक लाटा जोरजोरात आदळाव्यात, तसे सोनिया गांधी यांना रडण्याचे कढावर कढ येत होते. प्रियांका व्हिन्सेंट जॉर्जकडे वळली.

माझे डॅडी कुठे आहेत? तिनं विचारलं.

आता ह्या क्षणी ते त्यांना मद्रासला आणत आहेत.

प्लीज, तिकडे जाण्यासाठी आम्हाला लागेल ती मदत करा. प्रियांकाने व्हिन्सेंट जॉर्ज यांना विनंती केली.

प्रियांकाने अवघ्या एकोणीस वर्षाचं वय असताना देखील परिस्थितीचा ताबा घेतला. तो घेताना तिनं दाखवलेली प्रगल्भता, धीरोदात्तपणा आणि धडाडीनं पुढची सगळी व्यवस्था करणं हे सगळंच कौतुकास्पद होतं. प्रियांका राजीवजींच्या मित्रांशी आणि काँग्रेस नेत्यांशी बोलली. सगळेजण तिथे येत होते. सगळे खूपच गोंधळलेले, शोकाकुल होते. त्यातले कांहीजण रडत होते.

प्रियांका राष्ट्रपती वेंकटरमण ह्यांच्याशी बोलली. परंतु आपले वडील ह्या जगात नाहीत, ह्यावर विश्वास ठेवावा असं तिला अजूनही आतून वाटत नव्हतं. प्रियांकाचं मन तिला ते मान्य करू देत नव्हतं. जणू ती एक प्रकारे तिच्या मनाची प्रतिक्षिप्त क्रियाच होती, त्या मनोवस्थेमुळेच प्रियांकाला दुःख न करता प्रसंगावधान राखून काम करणं जमत होतं. मनातल्या मनात प्रियांकाला असंही वाटत होतं, की हे इतकं भयंकर घडलंय असं लोकं म्हणतायत, पण आपण कांहीच खातरजमा न करता ते कसं काय स्वीकारायचं ? म्हणूनच तिला लवकरात लवकर आपल्या वडिलांना पाहायचं होतं.

तिथं जाणं कितपत योग्य राहील? राष्ट्रपती व्यंकटरमण यांनी प्रियांकाला विचारलं.

प्लीज, सर, मला जायचं आहे.माझी आई आणि मी.... आम्हा दोघींना मद्रासला आज आत्ता रात्रीच जायचं आहे.

ठिक आहे, मी लष्कराशी बोलून हवाईदलाच्या विमानाची सोय करतो आणि नंतर तुम्हाला घरी भेटायला येतो.

थँक्यू, आम्ही वाट पहातो तुमची. प्रियांका व्यंकटरमण यांना बोलल्या.

आता प्रियांकाला हार्वर्ड विद्यापीठात, आपल्या भावाला (राहुल गांधी) ती बातमी देणं भाग होतं. तिथं त्या वेळेस दुपारच्या जेवणाची वेळ होती.

प्रियांकाने राहुलच्या वर्गमित्राला सांगितलं, की राहुलला ताबडतोब घरी फोन करायला सांगा. त्यानंतर एका तासानं बहिणींन आणि आईनं राहुलला त्याच्या जीवनातील सर्वात वाईट बातमी दिली.


मला माहीत होतं, मला माहीत होतं ते...राहुल बातमी ऐकताच रडत होता आणि रडता रडता ओठ चावत होता. काय होणार आहे, हे मला ठाऊक होतं.

आम्हांला जेवढं जमलं, तेवढं आम्ही केलं....

राहुल म्हणाला....तुम्हाला वाटतं का तसं?

प्रियांका राहुलला म्हणाली....होय रे,

सोनियाजी व प्रियांका ह्या मायलेकींनी राहुलला मिळेल त्या विमानाने भारतात निघून



येण्यास सांगितलं.

अंतिम संस्कारासाठी आम्ही तुझी वाट बघतोय. प्रियांका राहुलला म्हणाली.

मध्यरात्र उलटून गेली होती आणि बातमी दिल्लीत सर्वत्र पसरली होती.एव्हान राजीवजींच्या निवासस्थानाच्या फाटकापाशी जमाव जमू



लागला.लोकांचे जोरजोरात रडण्याचे आणि छाती बडविण्याचे आवाज सोनियाजींना व प्रियांकाला घरात ऐकू येत होते. राजीवजींचे स्नेही, सहकारी, मंत्री, पोलीस अधिकारी आणि बाकीचे लोक राजीवजींच्या निवासस्थानी जमू लागले होते. खरोखरच ती एकप्रकारची घुसखोरीच होती. वर्तमानपत्रांचे लोक फाटकाशी आणि रस्त्यावर ठाण मांडून बसले. शीखांविरूद्ध की मुसलमानांविरूद्ध,हिंदू मूलतत्व वाद्यांविरुद्ध की एल. टी. टी. विरूद्ध.... कुणाविरूद्ध आपला संताप व्यक्त करायचा, तेच लोकांना अजून कळलं नव्हतं. त्यामुळे वैतागलेल्या लोकांनी शेवटी पत्रकारांनाच आपल्या रागाचं लक्ष्य करायला सुरवात केली. रस्त्यावर तर अशी स्थिती होती, की राजीवजींच्या घरी भेटायला आलेल्या राष्ट्रपती व्यंकटरमण यांना राजीवजींच्या निवासस्थानी शिरणं जवळपास अशक्य झालं होतं. राजीवजींच्या निवासस्थानी फाटकापाशी अत्यंत भयभीत, व्याकूळ मनःस्थितीतला जमाव गोळा झाला होता. जमावातले लोक राष्ट्रपती व्यंकटरमण यांच्या गाडीवर पडले आणि जोरजोरात रडू लागले, अतीव दुःखाने असहाय्य होऊन किंचाळू लागले.

आम्ही ह्या नियंत्रणा बाहेर जाणाऱ्या जमावाला हटवू का? सुरक्षा आधिकाऱ्यानं राष्ट्रपतींना विचारलं.

नको, आपण मागं वळू या, माझ्यामते वातावरण आणखी तापायला नको आहे. राष्ट्रपती त्यांच्या सुरक्षा अधिकारयाला बोलले.

परत फिरल्यावर राष्ट्रपतींनी राष्ट्रपती भवनातून सोनियाजींना फोन केला. सोनियाजी आता थोड्या सावरल्या होत्या. त्यामुळे राष्ट्रपतींनी केलेलं सांत्वन स्वीकारण्याच्या आणि राष्ट्रपती व्यंकटरमण यांनी प्रियांकाच्या विनवणीला मान देऊन ऐन मध्यरात्री मद्रासला राजीवजींना बघण्यासाठी जाण्यास पुरवलेल्या सुविधांबद्दल त्यांचे आभार मानण्याच्या मनःस्थितीत होत्या.

सोनियाजींनी राष्ट्रपती व्यंकटरमण यांच्याशी बोलणं संपवून फोन ठेवला आणि त्या प्रियांकाला सोबत घेऊन तडक निघाल्या....

सोनियाजींना व प्रियांकाला विमानतळावर नेण्यासाठी बाहेर गाडी उभी होती.....

राजीव गांधी यांनी संजय गांधी यांच्या पावलावर पाऊल टाकून राजकारणात यावं म्हणून पुष्कळ प्रयत्न करणारे गांधी कुटुंबाचे जुने स्नेही टी. एन. कौल ह्यांनीच सोनियाजी व प्रियांकाला गाडीनं विमानतळावर सोडलं. राजीवजींच्या निवासस्थानी प्रचंड गर्दी जमली होती. त्या गर्दीतून गाडीनं कशीबशी वाट काढली. रस्त्यांवर फार खळबळ माजलेली दिसत होती. लोकांचे घोळकेच्या घोळके नाक्यांनाक्यांवर आणि ट्रॅफिक सिग्नलपाशी जमले होते. सर्वांच्या मनात अनावर क्षोभ आणि शोक दाटून आला होता. सरकारनं लवकर पावलं उचलावीत आणि इंदिराजी गेल्यावर ज्या तऱ्हेचा हिंसाचार शहरात उसळला, तसा हिंसाचार पसरणार नाही ह्याची काळजी घ्यावी. टी. एन. कौल म्हणाले.

मद्रासचा विमानप्रवास साडे तीन तासांचा होता. खाली काळोखात पसरलेली जमीन दिसत होती. त्यातच मध्ये प्रकाशाचे छोटे छोटे ठिपके दिसत होते, त्यामुळे तिथं गावं आहेत हे कळत होतं. सारा भारतदेश गाढ झोपेत होता. थोड्याच वेळात आणखी एका राजकीय हत्येच्या शोककर बातमीनं तो जागा होणार होता आणि मग कांही घटकांतच दुःखसागरात बुडून जाणार होता. विमानप्रवास कुणीही बोलत नव्हतं. फक्त सोनियाजींच्या हुंदक्यांचा तेवढा आवाज येत होता.

पहाटे साडेचार वाजता सोनियाजी व प्रियांका मद्रासला पोचल्या. बाहेर अजूनही अंधार होता. विमान जुन्या मद्रास टर्मिनलवर उतरलं. सोनियाजी व प्रियांकाला सोपं पडावं म्हणून अधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार राजीवजींचे बॉम्बस्फोटात छिन्नविछिन्न झालेल्या शरीराचे अवशेष विमानतळावरच आणले होते.तसं केल्यानं सोनियाजी व प्रियांकाला मोटारीनं प्रवास करून शहरात जावं लागलं नाही.सोनियाजी व प्रियांका खूप बेचैन होत्या....राजीवजींचा मृतदेह त्यांना पाहायचा होता, त्यांच्या मृत्यूचं वास्तव स्वीकारण्यासाठी मनाला भाग पाडायचं होतं. विमानाच्या पायऱ्या उतरत असतेवेळी सोनियाजी व प्रियांकाच्या मनात अनेक प्रश्न थैमान घालत होते. विमानातून खाली उतरतेवेळी सोनियाजींनी सुमन दुबे ह्या राजीवजींच्या जुन्या, निष्ठावंत मित्राला पाहिलं, तेंव्हा सोनियाजींना स्वतःला आवरताच येईना. कांहीतरी चमत्कार झाल्यासारखं सुमन दुबे त्या स्फोटातून वाचला होता.

सोनियाजी व प्रियांकाला राजीवजी दिसलेच नाहीत.कितीही प्रयत्न केले तरीही सोनियाजी व प्रियांका राजीवजींना पाहूही शकत नव्हत्या कारण त्या ठिकाणी जमलेल्या अधिकाऱ्यांनी व लोकांनी सोनियाजी व प्रियांकाला सांगितलं की राजीवजींचा मृतदेह अशा अवस्थेत आहे की त्यावर काही प्रक्रिया करणंही अशक्य आहे. सोनियाजी व प्रियांकाने जे पाहिलं त्या होत्या केवळ दोन शवपेटिका.त्यातील एकात राजीवजींचे अवशेष होते आणि दुसऱ्यात राजीवजींच्या अंगरक्षकाचे - प्रदीप गुप्ताचे !

शवपेटिका विमानात चढवल्या जात असतानाचं दृश्य दोघी मायलेकी एकमेकींना घट्ट पकडून पाहत होत्या. विमानात चढल्यावर सोनियाजींनी एका हातानं शवपेटिकेवर फुलांचा हार घातला आणि दुसऱ्या हातानं डोळ्यांतले अश्रू पुसले. जे वास्तव मान्य करायला प्रियांकाचे अंतर्मन तयार होत नव्हतं, ते वास्तव आता मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हतं. तिचा पिता त्या शवपेटिकेच्या आत होता.... प्रियांकाला एकदम जाणीव झाली, की ह्यापुढे माझे वडील मला कधीच....कधीच दिसणार नाहीत.... वडीलाची माया, पित्याच्या वात्सल्याची ऊब ह्यापुढे आपल्याला कधीच मिळणार नाही,त्या जाणिवेनं प्रियांका एकदम उन्मळून पडल्यासारखी झाली. शवपेटिकेला धरून ती कितीतरी वेळ हुंदके देत बसली. त्या क्षणी सोनियाजींनी जे केलं....

त्याचं राजीवजींना नक्कीच कौतुक वाटलं असतं. सोनियाजींना दिसलं, की राजीवजींचा अंगरक्षक प्रदीप गुप्ताच्या शवपेटिकेवर एकही फूल वाहिलेलं नाहीये, तेंव्हा सोनियाजींनी मोगऱ्याच्या फुलांची एक माळ प्रदीप गुप्ताच्या शवपेटिकेवर ठेवली.

पहाटेचं तांबड फुटत असताना राजीवजींच्या शवपेटिकेला घेऊन विमान राजधानीच्या दिशेनं उडालं. देशाला आधुनिकतेच्या, संगणकीय क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा करणाऱ्या भारत मातेच्या महान सुपुत्राचा राजीव गांधी यांचा शेवटचा प्रवास सुरू झाला होता.....!

भारतमातेच्या या महान सुपूत्रास आदरणीय राजीवजी गांधी यांना स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

संदर्भ :- सोनिया गांधी : राजीव
( दिल्ली साऊथ एशिया बुक्स : १९९२)

## प्रेमविवाहानंतर विवाहितेचा अमानुष छळ
## नाशिकमध्ये पतीसह सासरच्यांवर गुन्हा

■ नाशिक

**नाशिकमध्ये** एका विवाहितेचा जात वेगळी असल्याच्या कारणावरून सासरच्या मंडळींकडून अमानुष छळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तू आमच्या जातीची नाहीस, असे टोमणे मारत तिच्या इच्छेविरुद्ध तब्बल आठ वेळा गर्भपात घडवून आणल्याचा गंभीर आरोप पीडित महिलेने केला आहे. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेचा प्रेमविवाह झाला होता. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस सर्व काही सुरळीत होते. त्यानंतर सासरच्या मंडळींकडून तिच्या जातीवरून टोमणे मारत मानसिक छळ सुरू



करण्यात आला. महिलेने तक्रारीत म्हटले आहे की, गर्भधारणा झाल्यानंतर सासूने तू आमच्या जातीची नाहीस, त्यामुळे तुझ्या मुलांना आम्ही स्वीकारणार नाही, अशी भूमिका घेतली. यानंतर सासरच्या लोकांकडून सातत्याने मानसिक दबाव टाकण्यात आला. तसेच शारीरिक छळ करून विवाहितेचा एक-दोनदा नव्हे, तर तब्बल आठ वेळा गर्भपात घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. या काळात महिलेला सतत शिवीगाळ, अपमानास्पद वागणूक आणि धमक्या दिल्या जात होत्या. पीडितेच्या म्हणण्यानुसार, तुला वेडी ठरवून मानसिक रुग्णालयात दाखल करू अशी धमकीही तिला वारंवार दिली जात होती. सुरुवातीला विवाहिता आणि तिचा पती पुण्यात नोकरीनिमित्त राहत होते. मात्र, नोकरी गेल्यानंतर जुलै २०२५ मध्ये ते नाशिकला परतले.

## पेट्रोल-डिझेलसाठी रात्रभर मुक्काम
## पंप मालकाकडून कढी-खिचडी जेवण

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील धरणगाव येथे पेट्रोल पंप चालकाने माणुसकीचे दर्शन घडवत पेट्रोल डिझेलसाठी रात्रभर थांबलेल्या शेतकऱ्यांच्या जेवणाची सोय केली. याचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून अनेकांनी पंप मालकाचे कौतुक केले आहे.

धरणगाव - चोपडा रस्त्यावरील पवार पेट्रोल पंपावर डिझेलचा साठा उशिरा रात्री येणार असल्यामुळे अनेक शेतकरी मुक्कामी थांबले होते. शेतकरी उपाशी राहू नयेत म्हणून पेट्रोल पंप चालकाने त्यांच्यासाठी कढी आणि

**पेट्रोल पंप मालकाचे सर्वत्र कौतुक**

खिचडीची व्यवस्था केली. डिझेल मिळण्यासाठी तासनतास वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांनीही पेट्रोल पंप चालकाने दाखवलेल्या माणुसकीबद्दल समाधान व्यक्त केले. याची जिल्ह्यात मोठी चर्चा सुरू आहे.

## मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या
## ७ धरणांत २० टक्केच पाणीसाठा

■ मुंबई

**मुंबई** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांतील जलसाठा आता २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे मुंबईत पालिकेने १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू केली आहे.परंतु मुंबईच्या पाणी पुरवठ्याची मदार आता राखीव पाणीसाठ्यावर राहणार आहे. कारण अप्पर वैतरणा व भातसा धरणातून राखीव पाणीसाठा देण्यासाठी राज्य सरकारने नुकतीच मंजुरी दिली आहे.

मुंबईसाठी तानसा, मोडकसागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, भातसा, विहार व तुळशी या सात धरणांतून दररोज ३,९५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा होतो. वर्षभरासाठी मुंबईकरांना १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटर पाण्याची गरज भासते. काल २० मे रोजी सातही धरणांत २०.१ टक्के म्हणजे २ लाख८९ हजार ५७२ दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध असल्याचे समोर आले आहे.त्यामुळे पाऊस यायला उशीर झाल्यास मुंबईला अतिरिक्त पाण्याची गरज भासू शकते. यासाठी राज्य सरकारच्या अप्पर वैतरणा व भातसा धरणातून राखीव पाणीसाठा मिळावा, अशी मागणी पालिकेने सरकारकडे केली होती. पालिकेची ही मागणी राज्य सरकारने मंजूर

**राखीव पाणीसाठ्याला राज्य सरकारची मंजुरी**

केली आहे. त्यामुळे मुंबईकरांचा ऑगस्टपर्यंतचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

सध्या सातही तलावांत फक्त २,८२,५७२ दशलक्ष लीटर पाणी आहे. मुंबईला दररोज ३,९५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा होतो. मात्र राखीव कोट्यातील २२८३०० पाणी वापरण्याची परवानगी मिळाली असल्याने मुंबईच्या पाणीपुरवठ्याची किमान दोन महिने राखीव कोट्यावर मदार राहणार आहे. अप्पर वैतरणा धरणातून ९३ हजार ५०० दशलक्ष लीटर तर भातसा धरणातून १ लाख ३७हजार दशलक्ष लिटर राखीव पाणीसाठ्याची मागणी सरकारकडे केली होती.

## गडचिरोलीत एसटी बस उलटली
## चिमुकल्यासह ३ ठार! ३३ जखमी

■ गडचिरोली

**गडचिरोलीहून** उमरखेडकडे निघालेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसचा आज सकाळी मुरखला गावाजवळ भीषण अपघात झाला. बस अचानक रस्त्याच्या कडेला उतरून उलटल्याने बसमधील ७ महिन्याच्या चिमुकल्यासह ३ जणांचा मृत्यू झाला. तर ३३ प्रवासी जखमी झाले आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, बस अचानक अनियंत्रित झाली आणि रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. अपघाताच्या वेळी बसमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करत होते. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत बसमधील प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## बिजासन माता मंदिर मंदिराचा
## गाभारा सोन्या-चांदीने मढवणार

**५ कोटींचा खर्च**

■ धुळे

**शिरपूर** तालुक्यातील महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या प्रसिद्ध बिजासन माता मंदिर मंदिराचा गाभारा सुमारे ५ कोटी रुपये खर्च करून सोन्याचांदीने मढवला जाणार आहे. त्यासाठी



१५१ किलो चांदी व अर्धा किलो सोन्याने भव्य नक्षीकाम, सजावट करण्यात येणार आहे.

इंदूर येथील प्रसिद्ध बाबाश्री इंटरप्राइजेस ही संस्था हे मंदिराच्या गाभारा सजावटीचे काम करणार आहे. पहिल्या टप्प्यात येत्या आगामी शारदीय नवरात्रोत्सवापर्यंत मातेचे मुख्य गर्भगृह आणि सिंहासनाचे चांदीच्या सजावटीचे काम पूर्ण केले जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात मंदिराचे भव्य दरवाजे, बाह्य तोरण आणि मुख्य प्रवेशद्वारांचे सौंदर्यीकरण केले जाईल. महाकाल मंदिराच्या धर्तीवर कलाकृती काम पूर्ण झाल्यानंतर बिजासन घाटाची ओळख देशभर नव्या आध्यात्मिक वैभवाच्या रूपात निर्माण होणार आहे.

हे काम करणारी संस्था देशभरात प्रसिद्ध असून, त्यांनी उज्जैनच्या जगप्रसिद्ध महाकाल मंदिरासह देशातील अनेक मोठ्या धार्मिक स्थळांवर चांदी व सोन्याच्या सजावटीचे काम केले आहे. भाविकांनी चांदी, गुप्त देणगी किंवा इतर कोणत्याही स्वरूपात मातेच्या चरणी आपले सहकार्य अर्पण करावे, असे आवाहन मंदिर समितीचे पदाधिकारी मोहन जोशी यांनी केले आहे.

## काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी
## पुन्हा सतेज पाटील नियुक्त

■ कोल्हापूर

**काँग्रेस** पक्षाने महाराष्ट्रातील संघटनात्मक बळकटीसाठी जिल्हाध्यक्षांच्या नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या मान्यतेनंतर पक्षाचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी या नियुक्त्यांची अधिकृत घोषणा केली आहे. नव्या यादीत कोल्हापूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी मंत्री सतेज पाटील यांची पुन्हा निवड करण्यात आली आहे. तसेच, कोल्हापूर शहर जिल्हाध्यक्षपदी प्रवीण केसरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, नागपूर शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी पक्षाचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांची निवड केली आहे.


## मालवणमध्ये २६ मेपासून
## जलपर्यटन पूर्णपणे बंद



■ मालवण

**मालवणमध्ये** यंदाच्या पर्यटन हंगामाचा शेवटचा टप्पा सुरू आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मालवण बंदर क्षेत्रात सर्व प्रकारची प्रवासी जलवाहतूक आणि व्यावसायिक जलक्रीडा पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश महाराष्ट्र सागरी मंडळाने जारी केले आहेत. हा बंदी आदेश २६ मेपासून ते ३१ ऑगस्टपर्यंत लागू राहणार आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मालवण बंदर निरीक्षकांनी अधिकृत पत्र काढून ही बंदी जाहीर केली आहे. हा बंदी आदेश मालवणमधील एकूण ३९ प्रमुख संस्था, गृहनिर्माण व पर्यटन सोसायट्या आणि वैयक्तिक बोटचालकांना थेट बजावण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने सिंधुदुर्ग किल्ला प्रवासी वाहतूक वेल्फेअर असोसिएशन, शिवशक्ती जलपर्यटन संस्था चिवला जलपर्यटन संस्था, तारकर्ली देवबाग दांडी येथील बोटिंग संघटना व वॉटर स्पोर्ट्स संस्था, तसेच स्थानिक स्कुबा डायव्हिंग व्यावसायिक आणि वैयक्तिक बोटमालकांना लागू असेल. कोकण किनारपट्टीवर पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो.




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# साठा आहे मग तुटवडा का?

ज्या पद्धतीने युद्धजन्य परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न होतो आहे तो पुरेसा नाही हे सप्ष्ट होते. इराण आणि अमेरिकेतला संघर्ष ज्यावेळी शिगेला पोहोचला होता त्यावेळी देशभरात इंधन टंचाईची जोरदार अफवा पसरली. पेट्रोल-डिझेल खरेदी करण्यासाठी पेट्रोल पंपांवर लागलेल्या रांगांपासून ते गॅस सिलिंडर खरेदीसाठी उडालेली धांदल कल्पनेपलिकडची होती. कारण प्रत्यक्षात परिस्थिती तशी नसताना टंचाई होईल या भीतीने लोकांनी इंधन खरेदीसाठी गर्दी केली होती. आता युद्ध संपवून जवळपास महिना होत आला. ज्या होर्मुज सामुद्रधुनीतून इंधन आणणारी जहाजं सुखरूपपणे भारतात पोहोचू लागली आहेत. आणि येणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पुरेसा साठा शिल्लक ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे. संपूर्ण देशात इंधनाची योग्य प्रमाणात पूर्तता केली जाते आहे. तरीदेखील पुन्हा एकदा इंधन टंचाईच्या भीतीने जिकडे तिकडे रांगा लागलेल्या दिसतात. विशेषतः महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा या इंधनटंचाईचे विचित्र चित्र निर्माण झालेले दिसते आहे. पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा तर आहेतच. परंतु शेतकरीसुद्धा ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलकरीता रांगा लावताना दिसत आहेत. सुदैवाने गॅस सिलिंडरबाबत परिस्थिती फारशी हाताबाहेर गेलेली दिसत नाही. राज्यातल्या एखाददुसऱ्या जिल्ह्यात पेट्रोल पंपांवरच्या रांगा लागलेल्या समजू शकतात. परंतु महाराष्ट्रातल्या जवळपास प्रत्येक जिल्ह्यात पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल संपल्याच्या पाट्या पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत सरकारकडून राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही हे वारंवार सांगितले जात आहे. इंधनाचा पुरेसा साठा आहे. लोकांनी घाबरून साठा करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारांमुळे इंधनाची पुरवठा साखळी विस्कळीत होते. सरकारी पातळीवर हा खुलासा जरी योग्य ठरत असला तरीसुद्धा अशा प्रकारची टंचाई निर्माण होण्याचे कारण काय यामागची नेमकी परिस्थिती समोर येणे गरजेचे आहे. ज्याअर्थी विशिष्ट मुदतीआधीच पेट्रोल पंपांवरचा इंधन साठा संपत असेल तर मागणीमध्ये अनावश्यक वाढ झाली असली पाहिजे किंवा पेट्रोल पंप चालकांनी ही कृत्रिम टंचाई निर्माण केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**परस्परविरोधी विधाने**

केंद्र आणि राज्य सरकारकडून वारंवार साठा भरपूर असल्याचे सांगितले जाते आहे. तरीसुद्धा एकाच नाही तर अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल कसे काय संपते. जरी नागरीक भीतीने साठा करून ठेवत असले तरीसुद्धा पुरवठा ज्या वेळापत्रकाप्रमाणे कायम राहिला पाहिजे. याचा अर्थ पूर्वी सप्लाय चेन म्हणजेच पुरवठा साखळीतून जे वेळापत्रक होते तेसुद्धा कुठेतरी विस्कळीत झालेले दिसते. यामध्ये दोन महत्त्वाच्या शक्यता गांभीर्याने लक्षात घेतल्या पाहिजेत. एक म्हणजे या टंचाईसदृश्य परिस्थितीचा गैरफायदा घेऊन जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करीत असली पाहिजे. आणि दुसरी शक्यता म्हणजे काही प्रमाणात इंधन टंचाई निर्माण झालेली आहेच. परंतु बदललेल्या पुरवठा साखळीच्या वेळापत्रकाचे नियोजन झालेले दिसत नाही. पहिल्या शक्यतेप्रमाणे अगदी पेट्रोल पंप मालकांकडूनसुद्धा ही कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी मोठमोठ्या कॅन्स घेऊन अनेक लोक इंधन साठा करताना दिसतात. त्यातले कितीजण खरोखरच वाहन चालक किंवा ट्रॅक्टर चालक आहेत. किंवा जाणीवपूर्वक अशा प्रकारचा साठा करून तो दामदुप्पट किमतीने विकण्याचा प्रकारही होत असला पाहिजे. दुसऱ्या शक्यतेप्रमाणे सरकारने साठा भरपूर आहे अशी नुसती दवंडी पिटवून चालणार नाही. एकीकडे मुख्यमंत्री साठा भरपूर असल्याचे सांगतात तर दुसरीकडे राज्याचे पुरवठा मंत्री हे एक महिना पुरेल एवढाच साठा असल्याचे सांगतात. सरकारमधलाच हा विरोधाभास कृत्रिम टंचाईला आमंत्रण देणारा ठरतो. पुरवठा भलेही भरपूर असेल. परंतु युद्धानंतर परिस्थिती बदललेली आहे. आणि नकळतपणे प्रत्येक पेट्रोल पंपावर होणाऱ्या पुरवठ्यावर काही ना काही परिणाम झालेला आहे. ही सगळी शक्यता लक्षात घेऊन ही सप्लाय चेन सुरळीत करण्यासाठी सरकारला तितकेच प्रयत्न करावे लागतील. इतक्या वेळा सांगूनही लोकांचा सरकारवर विश्वास बसू नये. म्हणजेच सरकारी यंत्रणांनी तसे वातावरण निर्माण केलेले नाही.

**विश्वास निर्माण करा**

विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेल्या आठवड्यात काटकसरीच्या अनेक सूचना केल्या. त्यामध्ये इंधन काळजीपूर्वक वापरण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या या सूचनांवर देशभरातल्या सगळ्याच अर्थतज्ज्ञ आणि राजकीय पंडितांनी आपापले सूर लावले. आणि देशाची आर्थिक स्थिती भयावह असल्याचे अंदाज वर्तवले आहेत. सामान्य माणसाला त्याच्या दैनंदिन जीवनातल्या गरजांची जास्त चिंता असते. कारण याच इंधनाचा त्याच्या रोजीरोटीवर परिणाम होत असतो. आज लाखो दुचाकी वाहन चालक बस, रेल्वे टॅक्सीचा प्रवास परवडत नाही म्हणून स्वतःच्या वाहनाने कामावर पोहोचत असतात. जर इंधन मिळाले नाही तर त्याची अचानक फजिती होण्याची शक्यता असते. तीच समस्या छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्यांची असते. पेट्रोल पंपांवर ज्या रांगा दिसत आहेत, त्यात प्रामुख्याने दुचाकी वाहन चालकांची गर्दी असते. एकीकडे महागाईचा दणका तर दुसरीकडे अशा प्रकारच्या कृत्रिम टंचाईचा फटका बसत असल्याने लोकांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक ठरते. या सर्व परिस्थितीत राज्य सरकारने लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल असे वातावरण निर्माण करावे आणि मंत्री असतील, सरकारी अधिकारी असतील या सर्वांमध्ये समन्वय राहील. परस्परविरोधी विधाने होणार नाहीत. ज्यातून सामान्य माणसाची तारांबळ उडणार नाही. आज जरी सरकारच्यावतीने साठा भरपूर असल्याची ग्वाही दिली जात असली तरी भविष्यकाळामध्ये काही ना काही परिणाम इंधन पुरवठ्यावर होणार आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

देण्याची सवय लावून घेतली की येणं आपोआप सुरू होतं. मग तो मान असो, प्रेम असो, पैसा असो, प्रसिद्धी असो, जिव्हाळा असो किंवा वेळ.

## पंचांग

**शुक्रवार, २२ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ शुक्ल षष्ठी/सप्तमी**
*** नक्षत्र : आश्लेषा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**



**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-०७**

**जरथोस्तनो दिसो, राजा राममोहन रॉय जन्मदिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## घोळ मछली फ्राय



★ **साहित्य :** २ घोळ माशाचे तुकडे, १/२ चमचा मीठ, १/२ मोठा चमचा आले-लसूण पेस्ट, अर्ध्या लिंबाचा रस, १/२ चमचा कसुरी मेथी, १/४ चमचा काळी मिरी पूड, १/२ चमचा काश्मिरी लाल तिखट, १/२ चमचा कुटलेल्या लाल मिरच्या (चिली फ्लेक्स), १/२ मोठा चमचा कुटलेली धणेपूड, १/२ चमचा जिरेपूड, १/४ चमचा गरम मसाला, १/४ चमचा ओवा, १/४ चमचा हळद, एक चिमूटभर केशरी-लाल खाद्य रंग (ऐच्छिक), ४ मोठे चमचे बेसन, २ मोठे चमचे पाणी, तळण्यासाठी तेल, १/२ चमचा चाट मसाला.

★ **कृती :** माशाच्या तुकड्यांमध्ये मीठ, आले-लसूण पेस्ट आणि लिंबाचा रस घाला. सर्व व्यवस्थित मिसळून घ्या. उरलेले सर्व मसाले त्यात घाला. पुन्हा व्यवस्थित मिसळा आणि ३० मिनिटे मुरण्यासाठी बाजूला ठेवा.

बेसन आणि पाणी एकत्र करा. हे मिश्रण माशांवर घाला आणि माशांना बेसनाचे आवरण व्यवस्थित लावून घ्या.

मध्यम आचेवर, दोन्ही बाजूंनी प्रत्येकी ३ ते ४ मिनिटे मासे तेलात शॅलो फ्राय करून घ्या.

तळलेल्या माशांवर चाट मसाला भुरभुरा आणि गरम गरम वाढा.

# प्लेऑफ टॉप-२ साठी आज सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळूरची निर्णायक लढत

**आयपीएल २०२६ मधील ६७ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात उद्या हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. हा सामना लीग फेजमधील अखेरच्या टप्प्यातील अत्यंत महत्त्वाचा सामना असून, प्लेऑफमधील अव्वल दोन स्थानांसाठी दोन्ही संघांमध्ये जोरदार लढत पाहायला मिळणार आहे.**



■ हैदराबाद

या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाने दमदार कामगिरी करत गुणतालिकेत पहिले स्थान मिळवले आहे. १३ सामन्यांत १८ गुणांसह रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने सलग तीन विजय मिळवत आपला फॉर्म मजबूत केला. विराट कोहली, रजत पाटीदार, देवदत्त पडिक्कल, जितेश शर्मा यांसारख्या फलंदाजांनी सातत्यपूर्ण कामगिरी केली. तर गोलंदाजीत जोश हेझलवूड, भुवनेश्वर कुमार, कुणाल पंड्या आणि सुयश शर्मा यांनी महत्त्वाच्या क्षणी विकेट घेत संघाला विजय मिळवून दिला आहे. या सामन्यात विजय मिळाल्यास बंगळुरु अव्वल स्थान निश्चित करून प्लेऑफमध्ये दोन संधींसह प्रवेश करेल.

दुसरीकडे सनरायझर्स हैदराबाद संघही या हंगामात फॉर्ममध्ये आहे. १३ सामन्यांत ८ विजय मिळवत संघाने गुणतालिकेत तिसरे स्थान मिळवले आहे. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांच्या आक्रमक सुरुवाती, इशान किशनची स्थिर फलंदाजी आणि हेनरिक क्लासेनची स्फोटक मिडल ऑर्डर ही सनरायझर्स हैदराबादची मोठी ताकद ठरली. कर्णधार पॅट कमिन्सने गोलंदाजीत नेतृत्व करत संघाला अनेक महत्त्वाचे सामने जिंकून दिले आहेत. हा सामना जिंकल्यास हैदराबाद थेट अव्वल दोन स्थानांमध्ये प्रवेश करण्याची संधी निर्माण करू शकतो. या सामन्याचे महत्त्व अधिक वाढण्याचे कारण म्हणजे गुणतालिकेतील समीकरण. आरसीबी अव्वल स्थानावर असून, एसआरएच फक्त काही गुणांनी मागे आहे. त्यामुळे हा सामना जिंकल्यास एसआरएच नेट रन रेटच्या आधारे मोठी झेप घेऊ शकतो, तर आरसीबी आपले पहिले स्थान अधिक मजबूत करेल. हैदराबादची खेळपट्टी या हंगामात पूर्णपणे फलंदाजांना साथ देणारी ठरली आहे. येथे अनेक सामन्यांत २०० पेक्षा जास्त धावसंख्या उभारण्यात आली आहे. त्यामुळे या सामन्यातही मोठ्या धावसंख्येची अपेक्षा आहे. सुरुवातीच्या षटकांमध्ये फलंदाजांना फायदा मिळू शकतो. तर संध्याकाळी दव पडल्याने दुसऱ्या डावात धावांचा पाठलाग करणे सोपे होऊ शकते. त्यामुळे नाणेफेक जिंकणारा संघ बहुधा प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेईल. या सामन्यासाठी दोन्ही संघांचे संभाव्य प्लेईंग इलेव्हनही जवळपास निश्चित मानले जात आहेत. SRH कडून अभिषेक शर्मा, इशान किशन, हेनरिक क्लासेन आणि पॅट कमिन्स यांच्यावर मोठी जबाबदारी असेल. तर आरसीबीकडून विराट कोहली, रजत पाटीदार आणि टिम डेव्हिड यांच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. थोडक्यात, एसआरएच विरुद्ध आरसीबी हा सामना केवळ लीग सामना नसून प्लेऑफच्या अव्वल स्थानासाठीचा एक निर्णायक आणि अत्यंत रोमांचक सामना ठरणार आहे, ज्यात दोन्ही संघ आपली सर्वोत्तम कामगिरी देण्यासाठी मैदानात उतरतील.

## फिफा विश्वचषकापूर्वी ब्राझीलला धक्का! नेमार पुन्हा जखमी

■ ब्राझिलिया

**ब्राझीलचा** स्टार फुटबॉलपटू नेमार पुन्हा एकदा जखमी झाला आहे. फिफा विश्वचषक २०२६ पूर्वी ब्राझील संघाची चिंता वाढली. नुकतीच त्याची ब्राझीलच्या विश्वचषक संघात निवड झाली होती. मात्र आता पोटरीच्या दुखापतीमुळे तो काही दिवस मैदानाबाहेर राहण्याची शक्यता आहे.

सँटोस क्लबकडून खेळणारा ३४ वर्षीय नेमार कोपा सुदामेरिकाना स्पर्धेत सॅन लोरेन्झोविरुद्धच्या सामन्यात खेळू शकला नाही. क्लबच्या वैद्यकीय पथकाने मात्र दुखापत फार गंभीर नसल्याचे सांगितले आहे. संघाचे डॉक्टर रॉड्रिगो झोगाइब यांच्या मते, नेमार २७ मेपासून सुरू होणाऱ्या ब्राझीलच्या विश्वचषक सराव शिबिरासाठी फिट होऊ शकतो. पुढील सामन्यात त्याच्या पुनरागमनाचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.नेमारने ऑक्टोबर २०२३ मध्ये ब्राझीलसाठी शेवटचा सामना खेळला होता. उरुग्वेविरुद्धच्या विश्वचषक पात्रता सामन्यात त्याच्या गुडघ्यातील एसीएल लिगामेंट फाटली होती. त्यानंतर तो सतत दुखापतींशी झुंज देत आहे. बालपणीच्या सँटोस क्लबमध्ये परतल्यानंतर त्याने ३८ सामन्यांत १७ गोल केले.

फिफा विश्वचषक २०२६ हा नेमारचा चौथा विश्वचषक असणार आहे. यापूर्वी तो २०१४, २०१८ आणि २०२२ मध्ये ब्राझीलकडून खेळला. चार वेगवेगळ्या विश्वचषकांमध्ये ब्राझीलची प्रसिद्ध १० नंबरची जर्सी घालणारा तो पेले यांच्यानंतरचा दुसरा खेळाडू ठरू शकतो.

## हार्दिक पांड्याला दंड

**कोलकाता** - कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या आयपीएल २०२६ सामन्यात मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्यावर आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल दंडात्मक कारवाई झाली. ईडन गार्डन्सवर झालेल्या सामन्यात त्याने संतापाच्या भरात स्टंपवरील बेल्स जोरात पाडल्यामुळे त्याला सामना शुल्काच्या १० टक्के दंडासोबत १ डिमेरिट पॉइंट मिळाला. ही घटना मुंबईच्या गोलंदाजीदरम्यान दुसऱ्या डावातील १० व्या षटकात घडली.

## मलेशिया बॅडमिंटन मास्टर्समध्ये अश्मिता उपांत्यपूर्व फेरीत!

■ क्वालालंपूर

**मलेशिया** मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत भारतासाठी आजचा दिवस संमिश्र ठरला. महिला एकेरीत अश्मिता चालिहा हिने शानदार विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला तर मालविका बन्सोड हिला पराभवाचा सामना करावा लागला.

अश्मिताने मलेशियाच्या गोह जिन वेईचा सरळ गेममध्ये २१-१३, २१-१६ असा पराभव केला. सुरुवातीपासूनच तिने आक्रमक खेळ करत सामन्यावर नियंत्रण ठेवले. आता उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना डेन्मार्कच्या आठव्या मानांकित लाईन होजमार्क जार्सफेल्डशी होणार आहे.दुसरीकडे मालविका बन्सोडने पहिला गेम जिंकून चांगली सुरुवात केली होती. मात्र डेन्मार्कच्या लाईन होजमार्क जार्सफेल्डने जोरदार पुनरागमन करत सामना १६-२१, २१-८,

**मालविकाचा पराभव**

२१-१५ असा जिंकला. जवळपास एक तास चाललेल्या या सामन्यात मालविकाला अखेरीस पराभव पत्करावा लागला.

महिला एकेरीतील आणखी एका सामन्यात देविका सिहाग हिला चीनच्या अव्वल मानांकित चेन युफेईकडून २१-१६, २१-१३ असा पराभव स्वीकारावा



लागला.मिश्र दुहेरीत सात्विक कनापुरम आणि राधिका शर्मा यांची जोडी अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गे यांच्याकडून पराभूत झाली. तर पुरुष दुहेरीत हरिहरन आमसाकरुणन आणि एम. आर. अर्जुन यांनाही चीनच्या जोडीविरुद्ध हार पत्करावी लागली. याआधीच भारतीय स्टार खेळाडू लक्ष्य सेन आणि एच. एस. प्रणॉय स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

## मोहम्मद आमिरला ब्रिटिश नागरिकत्व आयपीएलमध्ये परतण्याची शक्यता

■ लंडन

**पाकिस्तानचा** माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिर आता ब्रिटिश नागरिक झाला आहे. त्याच्या पत्नीच्या आधारे त्याला यूके पासपोर्ट मिळाला असून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे नागरिकत्व देण्यात आले.

आमिरने २०२० मध्ये पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्यानंतर तो २०२४ मध्ये पुन्हा संघात परतला, पण टी-२० विश्वचषकानंतर त्याने पुन्हा निवृत्ती घेतली. त्याने पाकिस्तानकडून कसोटी, वनडे आणि टी-२० सामने खेळले आहेत आणि २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या संघात तो महत्त्वाचा गोलंदाज होता. आता तो ब्रिटिश नागरिक झाल्यामुळे आयपीएलमध्ये खेळू शकतो का? याबाबत चर्चा सुरू आहे. नियमांनुसार तो परदेशी खेळाडू म्हणून आयपीएल लिलावासाठी नोंदणी करू शकतो, पण कोणती फ्रँचायझी त्याला निवडते का यावर त्याचे खेळणे अवलंबून असणार आहे.

इंग्लंडमध्ये स्थानिक खेळाडूचा दर्जा मिळवण्यासाठी फक्त ब्रिटिश पासपोर्ट पुरेसा नसतो. मागील १२ महिन्यांत कोणत्याही पूर्ण सदस्य देशासाठी व्यावसायिक क्रिकेट न खेळण्याचा नियम आहे.

## खेळाडूंना डोपिंगसाठी औषधे पुरवल्यास ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकार आता क्रीडा क्षेत्रातील डोपिंगविरोधात कठोर पावले उचलली जात आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले की, डोपिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिबंधित औषधांचा पुरवठा किंवा तस्करी करणाऱ्यांना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.

सरकार राष्ट्रीय डोपिंग विरोधी कायद्यात सुधारणा करण्याच्या तयारीत असून, या नव्या नियमांनुसार खेळाडूंना प्रतिबंधित पदार्थ पुरवणाऱ्या व्यक्तींना पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास, दोन लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

मनसुख मांडविया म्हणाले की, आतापर्यंत फक्त डोपिंग करणाऱ्या खेळाडूंवर कारवाई केली जात होती. मात्र आता डोपिंगसाठी औषधे पुरवणारे, तस्करी करणारे आणि खेळाडूंना चुकीच्या मार्गावर नेणाऱ्यांवरही कारवाई करणे गरजेचे आहे.

## भारतीय बॅडमिंटनमध्ये मौनाची संस्कृती! ज्वाला गुट्टाची टीका

■ नवी दिल्ली

**माजी** भारतीय बॅडमिंटन खेळाडू ज्वाला गुट्टाने भारतीय क्रीडा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. आजी-माजी खेळाडू आणि संघटना सर्वजण तडजोड करत आहेत. पण व्यवस्थेतील चुका उघडपणे मांडायला कोणीही तयार नसल्याचे म्हटले. भारतीय बॅडमिंटनमध्ये मौनाची संस्कृती असल्याचेही तिने नमूद केले.



एका मुलाखतीत ज्वालाने सांगितले की, भारतात दर्जेदार राखीव खेळाडूंची कमतरता आहे. चीनचे उदाहरण देताना ती म्हणाली की, तिथे एखादा मोठा खेळाडू जखमी झाला तरी लगेच दुसरा जागतिक दर्जाचा खेळाडू तयार असतो. मात्र भारतात तशी 'बेंच स्ट्रेंथ' नाही. तळागाळातील खेळाडूंना योग्य संधी आणि पाठिंबा मिळत नसल्याने नवीन प्रतिभेला पुढे येणे कठीण जाते. ज्वालाने स्वतःची अकादमी चालवताना आलेल्या अडचणीही सांगितल्या. हैदराबादमध्ये ना-नफा तत्त्वावर अकादमी सुरू करूनही सीएसआर निधी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. माझा स्पष्टवक्तेपणा अनेकांना आवडत नाही. खेळाडूंच्या हक्कासाठी न्यायालयातही गेले होती. पण त्यावेळी इतर खेळाडूंनी पाठिंबा दिला नाही. राष्ट्रीय विजेती आणि जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असतानाही तिला अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा स्वतःच्या पैशातून खेळाव्या लागल्या. भारतीय व्यवस्थेत प्रतिभेपेक्षा ओळखी आणि संपर्कांना अधिक महत्त्व दिले जाते.

# देशात एकाचवेळी निवडणुका! ७ लाख कोटी वाचतील

■ गांधीनगर



## पडताळणी समितीचा दावा

**‘एक देश, एक निवडणूक’** हा प्रस्ताव देशाच्या हिताचा असून यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेतल्यास देशाचे तब्बल ७ लाख कोटी रुपये वाचू शकतात, तसेच देशाच्या जीडीपीमध्ये १.६ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, असा दावा या प्रस्तावाची पडताळणी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी.चौधरी यांनी केला आहे.

लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या प्रस्तावाचा अभ्यास करणारी ४१ सदस्यीय संसदीय समिती सध्या गुजरातच्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहे. गुजरातच्या मुख्य सचिवांना अहवाल सादर करण्याचे निर्देश गांधीनगर येथील गिफ्ट सिटीमध्ये मंगळवारी जेपीसीचे अध्यक्ष आणि भाजप खासदार पी. पी. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली.या बैठकीला गुजरातचे मुख्य सचिव एम. के. दास, सत्ताधारी भाजपाचे पदाधिकारी आणि विविध विभागांचे सचिव उपस्थित होते.

या बैठकीत चौधरी म्हणाले की, एकत्रित निवडणुका घेतल्याने हा वाचलेला पैसा देशाच्या विकासकामांसाठी, पायाभूत सुविधांसाठी आणि गरिबांच्या कल्याणासाठी वापरता येऊ शकतो.

आम्ही गुजरातच्या मुख्य सचिवांना या प्रस्तावा संदर्भात सर्व सरकारी विभागांच्या अभिप्रायाचा समावेश असलेला एक व्यापक आणि सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. हा अहवाल इतर राज्यांसाठी एक आदर्श मॉडेल ठरेल.

देश विदेश

# अफगाणिस्तान उपासमारीने हैराण जगण्यासाठी मुलांची विक्री

■ काबुल

**अफगाणिस्तानमध्ये** भूक, गरिबी आणि बेरोजगारीमुळे मानवी संकट अत्यंत गंभीर झाले आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, अनेक कुटुंबांना अन्न, औषधोपचार आणि कर्ज फेडण्यासाठी स्वतःची मुले विकण्याची वेळ आली आहे.

देशातील लाखो नागरिकांना आता दोन वेळचे अन्न मिळवणेही कठीण झाले असून उपासमारीमुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढत आहे. दुष्काळ, आर्थिक संकट, घटलेली आंतरराष्ट्रीय मदत आणि तालिबानच्या निर्बंधांमुळे अफगाणिस्तानातील सामान्य नागरिकांचे जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. गरीब कुटुंबांमधील मुलींची विक्री वाढत असल्याने जगभरातून चिंता व्यक्त केली जात आहे. घोर प्रांतातील सईद अहमद नावाच्या व्यक्तीने आपल्या पाच वर्षांच्या मुलीला विकल्याची माहिती दिली.

# फिलिपाइन्समध्ये गांधी-मंडेलांच्या डिजिटल अवतारांचे एआय सरकार

■ मनीला

**फिलिपाइन्समधील** एका छोट्या बेटावर एआय सरकार चालवण्याचा अनोखा प्रयोग सुरू झाला आहे. या बेटावर निर्णय माणसे नव्हे, तर ‘एआय’ घेणार आहेत. यामध्ये मंत्रिमंडळात महात्मा गांधी, नेल्सन मंडेला आणि विन्स्टन चर्चिल यांसारख्या जागतिक नेत्यांचे डिजिटल अवतार असणार आहेत.

हा प्रयोग ब्रिटनचे तंत्रज्ञान उद्योजक डॅन थॉमसन करत आहेत. त्यांनी पलावन बेटसमूहातील एका छोट्या बेटाला त्यांच्या ‘सेन्साय’ कंपनीच्या नावाने मायक्रोनेशन घोषित केले. मायक्रोनेशन म्हणजे स्वतःला स्वतंत्र राष्ट्र म्हणवणारे छोटे स्वयंघोषित देश, ज्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता नसते. या बेटावर १७ एआय बॉट्सचे डिजिटल मंत्रिमंडळ तयार केले आहे. हे बॉट्स महात्मा गांधी, नेल्सन मंडेला, एलेनॉर रूझवेल्ट, मार्कस ऑरेलियस आणि सन त्झू यांसारख्या नेत्यांच्या विचारसरणी आणि लेखनाच्या आधारावर आहेत. हे डिजिटल नेते प्रस्तावांवर चर्चा करतील, मतदान करतील आणि निर्णय घेतील.या प्रकल्पामागील उद्देश असा आहे की, एआयच्या मदतीने भ्रष्टाचार, राजकीय दबाव आणि वैयक्तिक स्वार्थापासून मुक्त प्रशासन उभे करणे. येथे ई-नागरिकांना विविध प्रस्ताव मांडण्याची संधी दिली जाणार असून एआय परिषद त्यावर निर्णय घेईल.

# शहा यांच्यावरील वादग्रस्त वक्तव्ये न्यायालयाचा खा. बॅनर्जींना दिलासा

■ कोलकाता

**निवडणूक** सभांमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात केलेल्या कथित वक्तव्यांप्रकरणी कोलकाता उच्च न्यायालयाने गुरुवारी तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांना संरक्षण दिले. बॅनर्जी यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई करण्यास न्यायालयाने पश्चिम बंगाल पोलिसांना मनाई केली आहे. हे संरक्षण ३१ जुलैपर्यंत किंवा प्रकरण निकाली निघेपर्यंत लागू राहणार आहे. न्यायालयाने असे निर्देश दिले की, अभिषेक बॅनर्जी यांनी पूर्वपरवानगीशिवाय प्रवास करू नये आणि कोणत्याही हालचालीपूर्वी तपास अधिकाऱ्याला ४८ तास आधी माहिती द्यावी.

सामाजिक कार्यकर्ते राजीब सरकार यांनी ५ मे रोजी, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान केलेल्या कथित चिथावणीखोर भाषणे केल्याचा आरोप करत अभिषेक बॅनर्जी यांच्याविरोधात बिधाननगर सायबर क्राइम पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवली होती. त्यानुसार १५ मे रोजी हा गुन्हा नोंदवण्यात आला. राजीब सरकार यांनी असा आरोप केला की, अभिषेक बॅनर्जी यांनी २७ एप्रिल ते ३ मे दरम्यान झालेल्या अनेक प्रचारसभांमध्ये भडकवणारी वक्तव्ये केली. या भाषणांमुळे समाजात वैमनस्य पसरले, सार्वजनिक शांतता भंग झाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना धमक्या देण्यात आल्या. सरकार यांनी काही भाषणांच्या लिंकही तक्रारीसोबत सादर केल्या होत्या.

# ६० वर्षांत पहिल्यांदाच काँग्रेसला तामिळनाडूच्या मंत्रिमंडळात संधी

■ चेन्नई

**तामिळनाडूतील** नवनियुक्त मुख्यमंत्री विजय यांनी आज मंत्रिमंडळाचा विस्तार केला. यात महत्वाची बाब म्हणजे टीव्हीकेच्या २१ मंत्र्यांसह काँग्रेसच्या दोन मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यामुळे गेल्या सुमारे साठ वर्षांच्या कालावधीत तामिळनाडूच्या सत्तेत काँग्रेसचा पहिल्यांदाच प्रवेश झाला आहे.

बऱ्याच नाट्यमय घडामोडींनंतर मुख्यमंत्री चंद्रशेखर जोसेफ विजय यांनी दोन आठवड्यांपूर्वी काँग्रेससह पाच पक्षांच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले.नियोजित कार्यक्रमानुसार मंत्रिमंडळ विस्तारात २३ मंत्र्यांचा समावेश करण्यात आला. आज सकाळी दहा वाजता लोकभवन येथे आयोजित शपथग्रहण सोहळ्यात राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी मंत्र्यांना शपथ दिली.

# चीनमध्ये मुसळधार पावसाचा कहर! १२ जणांचा मृत्यू

■ बीजिंग




**चीनमध्ये** मुसळधार पाऊस आणि पुरामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली. विविध भागांत आलेल्या पुरात आतापर्यंत किमान १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण बेपत्ता आहेत. हजारो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

मध्य चीनमधील हुनान प्रांतातील शिमेन काउंटीमध्ये मुसळधार पावसानंतर पूरस्थिती निर्माण झाली. येथे ५ जणांचा मृत्यू झाला तर ११ जण बेपत्ता आहेत. प्रशासनाकडून बचावकार्य सुरू असून १९ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.अवघ्या २४ तासांत या भागात ३३९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. काही शहरांमध्ये काही तासांतच विक्रमी पाऊस पडल्याने रस्ते पाण्याखाली गेले. हुबेई प्रांतातही परिस्थिती गंभीर झाली. अनेक रस्त्यांचे नद्यांमध्ये रुपांतर झाले असून बचाव पथकांना नागरिकांना बाहेर काढण्यासाठी फुगवता येणाऱ्या बोटींचा वापर करावा लागला. येथे काही घरे कोसळली असून तीन जणांचा मृत्यू झाला.दरम्यान, नैऋत्य चीनमधील गुइझोउ प्रांतात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे चार जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण बेपत्ता आहेत. अनेक भागांमध्ये घरे पाण्याखाली गेली असून रस्ते आणि दळणवळण व्यवस्था विस्कळीत झाली आहे.

३,७०० हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

प.पू. स्वामी चिन्मयानंद यांचा जन्म ८ मे १९१६ रोजी केरळमधील एर्नाकुलम या गावी झाला. प.पू. स्वामी चिन्मयानंद हे नाव आज सर्वपरिचित व सुपरिचित आहे. ‘चिन्मय मिशन’ चे कार्य हे आज संपूर्ण जगात वेदांतप्रसाराकरिता प्रचाराकरिता सर्वमान्य आहे. भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृती, साहित्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य रामकृष्ण मिशन तसेच चिन्मय मिशनच्या माध्यमातून सुरू आहे. भारतीय अद्वैतवाद कट्टे पुरस्कर्ते म्हणून आपल्याला स्वामी चिन्मयानंद यांच्याकडे पाहता येईल. ते महान तत्वश तर होतेच, त्याचबरोबर ते एक महान शिक्षणतज्ज्ञही होते. गीता तंत्रज्ञान, उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, आचार्यांची प्रकरण ग्रंथे ह्यावर त्यांची विपुल ग्रंथसंपदा आहे. ह्या ग्रंथसंपदेत त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान तसेच शिक्षणविषयक तत्त्वज्ञानही आढळते. त्यांनी केवळ तत्त्वज्ञानावरच ग्रंथसंपदा निर्माण केली असे नाही, तर शैक्षणिक विचारांवर, विशेषतः मूल्य शिक्षण, व्यक्तिमत्व विकास ह्या बाबींवरही त्यांनी प्रकाश टाकला आहे.



# भारतीय अद्वैतवादाचे पुरस्कर्ते: स्वामी चिन्मयानंद

**अनेकांना** त्यांनी मार्गदर्शन केले व त्यांना स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार बनविले. स्वामीजींच्या आईचे नाव मंकुअम्मा व वडिलांचे नाव कुल्लामेनन मेनन, त्यावेळी ते मोठे जमीनदार होते. अर्थात ऐश्वर्यसंपन्न घराण्यात स्वामीजींचा जन्म झाला. लटम्बी स्वामीगल या सिद्धपुरुषांनी ह्या बालकाचे नामकरण करून त्याचे नाव बाळकृष्ण ठेवले. अतिशय लाडाकोडात बाळकृष्णाचे बालपण व्यतित झाले. लट्टम्बी स्वामीगलसारख्या सिद्धपुरुषाच्या सहवासात त्यांना वयाच्या पाच वर्षांच्या आतच बरेचसे अध्यात्माचे बाळकडू मिळाले होते. कदाचित पुढच्या आयुष्यातील सगळ्याच कार्याचा तो पाया होता. बालपणीच आईचा मृत्यू हा छोट्या बालनसाठी खूपच मानसिक धक्का होता. ‘आई’ नुकतीच कळायला लागली आणि काळाने हिरावून नेली, हा दुर्दैवी आघात होता. माणूस जेवढा मोठा होतो तेवढीच त्याच्या आयुष्यात दुःखे जास्त असतातच. कदाचित हा नियतीचा नियम असावा. बालनच्या घरातील वातावरण खूपच धार्मिक होते. सकाळपासून सायंकाळपर्यंत घरातील वातावरणातून आपोआप बालकावर अध्यात्माचे संस्कार झाले; शिवाय सिद्धपुरुषांचा सहवास होताच. वयाच्या पाचव्या वर्षी त्याच्या औपचारिक शिक्षणास प्रारंभ झाला. श्रीराम वर्मा मुलांची शाळा, ही त्यांची शालेय जीवनाची सुरुवात होती. ह्या शाळेत संस्कृत, मल्याळम या भाषा शिकविल्या जात. मातृसुखापासून वंचित असणाऱ्या बालकावर कुटुंबातील सर्वांनी आपले लक्ष केंद्रित करून त्यांना लाडकोडात वाढविले. परिणाम व्हायचा तोच झाला आणि बाळकृष्णची खोडकर वृत्ती वाढली, पण बालन तेवढेच दयाळू व प्रामाणिकही होते. जीवनातील यांत्रिकतेचा त्यांना कायम तिटकारा होता. विज्ञानात त्यांना कधीच रस वाटला नाही. नावीन्याची त्यांना विलक्षण आवड होती. बालन मुळातच प्रखर बुद्धीचे चिकित्सक, कर्मकांडाच्या बाबतीत ते कामय संशयवादी होते. पण अंतर्मनातून मात्र ते शंकराचे उपासक होते. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण केरळमधील त्रिचुर येथील सेंट थॉमस कॉलेज येथे सुरू होते. काही काळाने ते पुढील शिक्षणासाठी लखनौ येथे गेले.

हा काळ ‘भारत छोडो’ आंदोलनाचा होता. त्याच काळात ते देशभक्तीने भारावून गेले, व बाळकृष्ण मेनन हे स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यातील एक सैनिक बनले. ते कट्टर देशभक्त होते. याच काळात त्यांनी तुरुंगवासाच्या नरकयातनाही भोगल्या. ह्याच काळातल्या एका घटनेचा उल्लेख या ठिकाणी करावासा वाटतो. दिल्लीच्या तुरुंगात असताना तुरुंगात टायफॉईडची साथ पसरली व बाळकृष्णावरही ह्या आजाराने हल्ला केला. अनेक कैदी मृत्युमुखी पडायला लागले. अशावेळी आजारी जास्त असणाऱ्यांना तुरुंगातून बाहेर फेकण्यात येत असे. ह्याच वेळी बाळकृष्णन यांनाही रस्त्यावर फेकण्यात आले. एका दयाळू स्त्रीने त्यांची ह्या काळात शुश्रूषा केली. अतिशय विदारक प्रसंग व इंग्रजांचे मानवतेला काळिमा फासणारे वागणे, अशा ह्या संघर्षातून बालकृष्णन यांचा जीवनाचा प्रवास सुरुच होता. इंग्रजीमध्ये एम. ए. प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले. जर्नालिझमच्या कोर्सचा अभ्यास केला. अनेक ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या. संपूर्ण भारत भ्रमण केले. भारतातील जीवन त्यांनी अतिशय जवळून पाहिले. रमण महर्षींच्या संपर्कात आले. रमण महर्षींच्या संपर्कात त्यांनी समाधी अवस्थेचीही अनुभूती घेतली. कर्मकांडाची चीड, जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान होतेच. संतचरित्राचे, संतविचारांचे चिंतन ह्या सर्व बाबी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हत्या. ह्याच विचाराने प्रभावित झालेले बालकृष्णन हृषीकेश येथे स्वामी शिवानंदांच्या आश्रमात गेले.

तेथे त्यांनी आश्रमपद्धतीचा खूप जवळून अभ्यास केला. त्यांच्या संन्यस्त जीवनाचा हा श्रीगणेशा होता. ह्याच आश्रमात त्यांनी छोटी छोटी व्याख्याने निर्भीडपणे द्यायला सुरुवात केली. ह्यासाठी त्यांना शिवानंदांनी प्रोत्साहित केले. येथेच त्यांच्या संन्यस्त जीवनाचे बीजारोपण झाले. आपल्या निकटच्या मित्राच्या मृत्युने त्यांना अधिकच अंतर्मुख बनविले व जीवनाचे प्रयोजन काय आहे, ही जिज्ञासा त्यांच्या मनात निर्माण झाली. येथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा प्रवास सुरू झाला. त्यांनी हृषीकेश येथील आनंदकुटीर आश्रमात प्रवेश केला. २४ एप्रिल, १९४८ रोजी बालकृष्ण मेनन यांची हिमालयाची यात्रा सुरू झाली. आधीच सौंदर्याचे निःस्सीम भक्त असल्याने हिमालयाच्या विराट सौंदर्याने त्यांचे मन भारावले. परंतु त्यांचा हा प्रवास अत्यंत खडतर होता. यमुनोत्री गंगोत्री, केदारनाथ ही पदयात्रा त्यांना खूप काही आध्यात्मिक अनुभूती देऊन गेली. ह्याच काळात उत्तरकाशी येथे त्यांची महान ज्ञानी व तपस्वी, स्वामी तपोवनम् यांची गाठ पडली. त्यांची यात्रा सुरू होतीच. या देशाटनात त्यांच्या आयुष्याला पूर्णपणे कलाटणी मिळाली होती. तपोवनम् स्वामींच्या संपर्कात आल्यावर त्यांच्या मनाने संन्यस्त राहून देशसेवा, लोकसेवा करण्याचा ठाम निश्चय केला. त्यांनी सर्व हिंदू धर्मातील ग्रंथांवर प्रभुत्व संपादन केले. तपोवन स्वामीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अध्ययनास प्रारंभ केला.

स्वामी तपोवन महाराज हे अत्यंत ज्ञानी, पण तेवढेच शिस्तप्रिय होते. या ठिकाणी स्वामी चिन्मयानंद अतिशय कठोर दिनचर्येत राहिले. परंतु शास्त्रप्रेम व गुरुप्रेम प्रबळ होते. त्यांच्या लक्षात आले की, आज समाजात माणूस आपल्या सुखाला, खऱ्या आनंदाला पारखा झाला आहे. त्याच्या जीवनात बराच ताणतणाव उत्पन्न झाला आहे. खऱ्या जीवनातून तो भरकटला आहे. मानवी जीवनात शांती व सुखाची निर्मिती व्हावी याकरिता त्यांना आता खरा धर्म शिकविणे आवश्यक आहे हे त्यांनी जाणले व त्यावर त्यांनी ‘भगवद्गीता’ हा उपाय योजला. कारण भगवंताने अर्जुनाला जी गीता सांगितली ती जीवन रणसंग्रामावर. जीवनसंघर्षाला यशस्वी तोंड देऊन त्यावर मात करण्याची व परम आनंदाला प्राप्त करण्याची भगवद्गीता म्हणजे एक राजमार्ग आहे. तपस्वी साधूच्या मनात राष्ट्रभक्ती जागृत झाली. तर अध्यात्म हे समाजाभिमुख बनते व ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते, याची प्रचिती स्वामी चिन्मयानंदांच्या स्वरुपात आपल्याला आढळते. ह्या कार्याला तपोवन स्वामींनी एकदम परवानगी दिली नाही, तर सर्वप्रथम त्यांनी अपरिग्रही साधू म्हणून समाजात वावरण्यास त्यांना आज्ञा दिली. स्वामीजींसमोर ध्येय पक्के होते. त्यांना आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे पुनरुज्जीवन करावयाचे होते. राष्ट्राची मृत झालेली राष्ट्रभक्ती जागृत करायची होती. ह्याही कार्यात त्यांना समाजाचा विरोध पत्करावा लागलाच, पण त्यांनी याची विशेष पर्वा केली नाही. कारण ध्येय उदात्त होते व ध्येयपूर्तीसाठी काहीही दिव्य करण्याची त्यांची तयारी होती. भारताच्या बाबतीत आजवर हेच दुर्दैव प्रगतीच्या आड आले की, भारतात ज्या चांगल्या बाबी निर्माण झाल्या त्या सगळ्यांना विरोध भारतानेच केला. पण ह्या विरोधी परिस्थितीतही ज्यांचे ध्येय पक्के होती त्यांनी आपला मार्ग सोडला नाही व त्यांनी भारताच्या प्रमुख शहरांतून आपल्या प्रवचन कार्यास प्रारंभ केला. यालाच ते ‘गंगोत्री योजना’ म्हणत असत. पण ह्यालाच त्यांनी पुढे ‘ज्ञानयज्ञ’ हे नाव प्राप्त करून दिले व संस्कृतीचे माहेरघर असणाऱ्या पुणे शहरापासून त्यांनी आपल्या या ज्ञानयज्ञास प्रारंभ केला. त्यांच्या पहिल्या प्रवचनाकरिता स्वामी शिवानंदांनी जो आशीर्वादपर संदेश दिला, त्यात त्यांनी जा, स्वामी विवेकानंदांप्रमाणे गर्जना कर!

# मुरबाड बस स्थानकाबाहेर शिवशाही बसचे ब्रेक निकामी

■ मुरबाड

**कल्याण-मुरबाड** राष्ट्रीय महामार्गावर मुरबाड बस स्थानकाच्या बाजूला असलेल्या तीन हात नाक्यावर कल्याण हून मुरबाड कडे येणाऱ्या शिवशाही बसचे ब्रेक फेल झाले मात्र चालकाच्या प्रसंगावधानने मोठी दुर्घटना टळली. राष्ट्रीय महामार्ग ६१ वर मुरबाड बस स्थानकासमोरील उड्डाण पुलाखालून येणार्या बसचे बस स्थानकाच्या आत शिरण्यापूर्वीच ब्रेक फेल झाले. मात्र चालकाने प्रसंगवधान दाखवून बस सुरळीत रित्या थांबवली यामुळे मोठी दुर्घटना टळली.

# राज्यात १ जूनपासून दोन महिने मासेमारी बंदी

■ वसई

**मत्स्यविभागाने** पश्चिम किनारपट्टीवर १ जूनपासून दोन महिन्यांसाठी मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे. मासेमारी बंदीचा कालावधी १ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ असा आहे. मासेमारीसाठी गेलेल्या नौकांना ३१ मे च्या आत किनाऱ्यावर परतणे बंधनकारक करण्यात आले आहे.

जून, जुलै या काळात माशांचा प्रजननाचा काळ असतो. या काळात मासे अंडी घालत असल्याने माशांची पैदास होत असते. त्यामुळे या काळात मासेमारी बंदी घातली जाते. मत्स्यविभागाने मान्सूनचा आढावा घेतल्यानंतर १ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत दोन महिन्यांसाठी मासेमारी बंदी लागू केली आहे. यांत्रिक बोटींना पूर्ण मासेमारी बंद असली तरी परवानाधारक बिगर यांत्रिक बोटींना मासेमारीसाठी परवानगी देण्यात आली आहे. राज्याच्या सागरी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासून १२ मैल) यंत्रचलित व यांत्रिक नौका मासेमारी करताना आढळल्यास कारवाई केली जाणार आहे.

# म्हाडा भवनाची दुरुस्ती करूनही पावसाळ्यापूर्वी पडझड व गळती




■ मुंबई

**गेल्या** पावसाळ्यापूर्वी वांद्रेतील म्हाडा भवनाच्या इमारतीचे लाखो रुपये खर्चून दुरुस्तीचे काम करण्यात आले होते. वर्षभरातच अनेक भागाची पडझड सुरू झाली आहे. तर काही जागी छतातून घाणपाण्याची गळती लागली आहे. त्यामुळे करण्यात आलेली कामे ही खाबूगिरीची साक्ष आहे. अशी चर्चा आहे.

म्हाडा भवनाच्या तळमजला पासून ते चवथ्या मजल्यापर्यंत असलेल्या प्रसाधनगृह, व्हरांडे (पेसेज) आणि काही कार्यालयातील अंतर्गत दुरुस्तीची कामे गेल्या वर्षी पावसाळ्यापूर्वी करण्यात आली होती. भवनाची इमारत आतून दिसायला चकचकीत असली तरी काही ठिकाणी दुरुस्तीच्या कामाचे पितळ उघडे पडण्यास सुरुवात झाली आहे काही प्रसाधनगृहाच्या छताला घाणपाण्याची गळती लागली आहे तर कार्यालयांच्या भिंतींना ओलसरपणा आलेला आहे. रंगरंगोटी केलेल्या कामांना भेगा पडू लागल्या आहेत. व्हरांड्यासह काही भागात छताचे सिमेंटचे प्लास्टर कोसळण्याच्या घटना अधून मधून घडू लागल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार आतच अशी अवस्था आहे तर मग पावसाळ्याचे चार महिने कसे जातील याची कल्पना न केलेली बरी.

# अकोल्यातील सिटी हॉस्पिटलमध्ये आग

■ अकोला

**अकोला** शहरातील सिटी हॉस्पिटलमध्ये आज दुपारी आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात मोठी घबराट आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आग लागल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने तत्परता दाखवत रुग्णांना सुरक्षितस्थळी हलवले, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

रुग्णालयाच्या एका भागात अचानक आग लागली आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात धूर पसरू लागला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन डॉक्टर, नर्स आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. काही रुग्णांना स्ट्रेचरवरून तर काहींना व्हीलचेअरच्या मदतीने बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# आंदोलनकर्त्या सफाई कर्मचारी महिलेचा मृत्यू

■ भाईंदर

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्यालयाबाहेर आंदोलन करताना अपघातात जखमी झालेल्या सफाई कर्मचारी महिलेचा मृत्यू झाला आहे. दोन दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी आज मिरा भाईंदर महापालिकेला भेट दिली होती.

# बुलेट ट्रेन स्थानक परिसरात टाऊनशिप पालिकेकडून जागेचा नकाशा प्रसिद्ध

■ वसई

**बुलेट** ट्रेन प्रकल्पातील नालासोपारा येथील वालईपाडा येथे बुलेट स्थानक तयार केले जात आहे. या स्थानक परिसरातील साडेचारशे हेक्टर जागेत जपानच्या धर्तीवर टाऊनशिप तयार केली जाणार आहे. या जागेचा विकास करण्यासाठी ‘लोकल एरिया प्लॅन’ तयार केला जाणार असून त्याची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेचे (बुलेट ट्रेन) काम प्रगतीपथावर आहे. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील वालईपाडा येथे बुलेट ट्रेनचे स्थाकन तयार केले जाणार आहे. या बुलेट ट्रेनसाठी अधिकाअधिक प्रवासी यावेत यासाठी रेल्वे स्थानक परिसरातील ४६७ हेक्टर जागेचा विकास केला जाणार आहे. त्यासाठी केंद्रीय गृहनिर्माण मंत्रालयाने विशेष समिती स्थापन केली आहे.

जपान इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सी (जायका) कंपनीबरोबर समन्वय ठेवून ही समिती काम करणार आहे. या ठिकाणी पर्यटन आणि उद्योगाला चालना देण्यासाठी बिझनेस हब विकसित केले जाणार आहे.

## 'धुरंधर : द रिव्हेंज' कायदेशीर अडचणीत

अभिनेता रणवीर सिंगची मुख्य भूमिका असलेला आणि प्रचंड उत्सुकता असलेला 'धुरंधर: द रिव्हेंज' हा चित्रपट कायदेशीर अडचणीत सापडला आहे. या चित्रपटात भारताच्या सशस्त्र दलांशी संबंधित अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय मोहिमांची माहिती उघड करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाला (सीबीएफसी) योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.

सशस्त्र सीमा बल (एसएसबी) मधील हेड कॉन्स्टेबल दीपक कुमार यांनी दिल्ली उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेत त्यांनी आरोप केला आहे की चित्रपटातील काही दृश्ये आणि संदर्भ ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट तरतुदींचे उल्लंघन करणारे असू शकतात. चित्रपटात दाखवण्यात आलेली लष्करी ठाणी, मोहिमांची ठिकाणे आणि वरिष्ठ अधिकारी व शहीद जवानांशी प्रेरित असलेली पात्रे ज्या पद्धतीने मांडली आहेत, ती देशाच्या सुरक्षेच्या आणि अखंडतेच्या दृष्टीने चिंताजनक आहेत. याशिवाय, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेद्वारे (डीआरडीओ) विकसित केल्या जाणाऱ्या औषधांविषयीच्या संवेदनशील बाबीही या चित्रपटात उघड केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.



न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, हा चित्रपट जरी काल्पनिक, मनोरंजनासाठी आणि कल्पकतेवर आधारित असला, तरी जनहित याचिकेत उपस्थित केलेले मुद्दे पूर्णपणे नाकारता येणार नाहीत. चित्रपटाचा समाजावर आणि देशाच्या सुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे. लष्करी मोहिमा, रणनीती आणि गोपनीय बाबी उघड होण्याबाबतच्या या तक्रारींची संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेतली पाहिजे, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. दिल्ली उच्च न्यायालयाने चित्रपटावर थेट कोणतीही बंदी किंवा निर्बंध न घालता, ही जनहित याचिकाच एक अधिकृत निवेदन (रिप्रेझेंटेशन) म्हणून विचारात घेण्याचे आदेश माहिती आणि प्रसारण मंत्रालय तसेच सेन्सॉर बोर्डाला दिले आहेत.




## 'ड्रॅगन'मधून सिद्धांतचे पदार्पण

**मल्याळम** चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक जुड अँथनी जोसेफ यांच्या आगामी 'ड्रॅगन' या भव्य चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून, याद्वारे अभिनेता सिद्धांत गुप्ता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'ज्युबली' या वेब सीरिजमधील जय खन्नाच्या भूमिकेसाठी विशेष कौतुक मिळालेला सिद्धांत या चित्रपटात सुपरस्टार ज्युनिअर एनटीआरच्या धाकट्या भावाची महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे.

चित्रपटाच्या टीझरमधून या कथानकाची अतिशय भव्य आणि थरारक झलक पाहायला मिळते. यामध्ये सिद्धांत गुप्ता आणि ज्युनिअर एनटीआर यांच्यातील पडद्यावरील नाते आणि भावनिक बंध हे या चित्रपटाच्या कथेचा मुख्य गाभा असल्याचे संकेत मिळतात. या चित्रपटाचे दिग्दर्शन जुड अँथनी जोसेफ करत आहेत, ज्यांनी यापूर्वी '२०१८: एव्हरीवन इज अ हिरो' या ऑस्कर नामांकित आणि प्रचंड यशस्वी चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते.

हा चित्रपट मूळ मल्याळम आणि तेलगू भाषेसह तमिळ, कन्नड आणि हिंदी अशा विविध भाषांमध्ये पॅन-इंडिया स्तरावर प्रदर्शित केला जाणार आहे. चित्रपटाच्या टीझरमधील भव्यता, वेगवान ॲक्शन आणि सिद्धांत गुप्ताची नवी भूमिका यामुळे जगभरातील प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

## 'किंग'मधील पुनरागमनपर्व'

**सुपरस्टार** शाहरूख खानच्या साठाव्या वाढदिवशी 'किंग' या चित्रपटाची पहिली झलक म्हणजेच टीझर प्रदर्शित होऊन सहा महिने उलटले आहेत. हा चित्रपट प्रदर्शित होण्यास अद्याप सात महिने बाकी असले, तरी प्रेक्षकांमध्ये याबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या निमित्ताने शाहरूख खान हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकारांसोबत कित्येक वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. या चित्रपटात अभिनेते अनिल कपूर एका अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार असून,



शाहरूख आणि अनिल तब्बल ३१ वर्षांनंतर एकत्र स्क्रीन शेअर करत आहेत. यापूर्वी ते १९९५ मध्ये आलेल्या 'त्रिमूर्ती' या एकमेव चित्रपटात एकत्र दिसले होते. ज्येष्ठ अभिनेते सौरभ शुक्ला यांच्यासोबत शाहरूख २६ वर्षांनंतर काम करत आहे. यापूर्वी त्यांनी 'बादशाह', 'हे राम' आणि 'मोहब्बतें' या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले होते. अभिनेता अर्शद वारसीसोबत शाहरूखने यापूर्वी 'कुछ मीठा हो जाये' या चित्रपटात एका विशेष भूमिकेत काम केले होते, मात्र आता ते पूर्ण लांबीच्या भूमिकेत एकत्र दिसणार आहेत.

या चित्रपटात राणी मुखर्जी ही शाहरूखची सहकलाकार आहे. राणीसोबत शाहरुखने सर्वाधिक म्हणजेच तब्बल बारा चित्रपटांमध्ये काम केले आहे, जवळपास दोन दशकांनी ही एव्हरग्रीन जोडी पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. याशिवाय जॅकी श्रॉफ, अभिषेक बच्चन, जयदीप अहलावत, दीपिका पदुकोण देखील या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. जुन्या आठवणींना उजाळा देणारी ही तगडी स्टारकास्ट 'किंग' चित्रपटाला अधिक भव्य आणि प्रेक्षकांसाठी खास बनवणार यात शंका नाही.



## 'दृश्यम-३'मधील 'संकेत'

**बहुप्रतीक्षित** मल्याळम चित्रपट 'दृश्यम ३' अखेर प्रेक्षकांच्या भेटीस आला असून चित्रपटगृहांमध्ये त्याला विक्रमी प्रतिसाद मिळाला आहे. यापूर्वी हा भाग 'दृश्यम' या लोकप्रिय मालिकेचा शेवटचा भाग असेल, अशी जोरदार चर्चा रंगली होती. मात्र,या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. कारण 'दृश्यम ३' चा शेवट एका अशा निर्णायक वळणावर होतो, जिथे निर्मात्यांनी अत्यंत हुशारीने या मालिकेच्या चौथ्या भागाची भक्कम पार्श्वभूमी तयार केली आहे. त्यामुळे हा या मालिकेचा शेवट नसून 'दृश्यम ४' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. चित्रपटातील घटना ज्या पद्धतीने पुढे सरकतात, ते पाहता आगामी 'दृश्यम ४' हा आधीच्या भागांपेक्षाही अधिक थरारक, उत्कंठावर्धक आणि गूढ असेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## काजल-श्रेयस प्रथमच एकत्र

**काजल** अग्रवाल आणि श्रेयस तळपदे यांची मुख्य भूमिका असलेल्या 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून, या चित्रपटाचा टिझर लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय विषयावर भाष्य करणारा हा चित्रपट २४ जुलै २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे काजल आणि श्रेयस पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. या चित्रपटाचे कथानक शेतीमधील कीटकनाशकांचा अतिवापर आणि रसायनांचा गैरवापर, तसेच त्याचे मानवी आरोग्यावर आणि समाजावर होणारे घातक परिणाम या गंभीर विषयावर प्रकाश टाकणारे आहे. झी स्टुडिओज आणि एमआयजी प्रॉडक्शन अँड स्टुडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून चेट्टन डीके यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.








## प्रीतम अँड पेड्रोचा टीझर रिलीज

**चित्रपट** दिग्दर्शक राजकुमार हिराणी यांच्या आगामी 'प्रितम अँड पेड्रो' या बहुप्रतीक्षित वेब सीरिजचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. सायबर गुन्हेगारी, गोंधळ, विनोद आणि अनपेक्षित नाट्य यांनी भरलेल्या एका अनोख्या जगाची झलक या टीझरमधून प्रेक्षकांना पाहायला मिळते. राजकुमार हिराणी यांचे ओटीटी क्षेत्रात हे पदार्पण असून, ही सीरिज येत्या ३ जुलै रोजी 'जिओ हॉटस्टार' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. या वेब सीरिजच्या माध्यमातून राजकुमार हिराणी यांचे सुपुत्र वीर हिराणी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहेत. टीझरमध्ये वीर हिराणी प्रितमच्या भूमिकेत आणि ज्येष्ठ अभिनेते अर्शद वारसी पेड्रोच्या भूमिकेत दिसत आहेत. हे दोन्ही पूर्णपणे भिन्न स्वभावाचे



नायक गोव्याच्या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हे, गैरसमज आणि विनोदी संकटांच्या जाळ्यात कसे अडकतात, याचे रंजक चित्रण यात पाहायला मिळते.

## डिझेल नाही! तपासाला कसा येऊ? पोलिसांच्या उत्तरावर फडणवीस भडकले

■ नागपूर

**नागपुरातील** पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. शोधमोहीम सुरू करण्यासाठी आमच्या गाडीत डिझेल नाही, त्यामुळे जाता येत नाही, असे उत्तर पोलिसांकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकाराचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत



संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी हा व्हिडिओ एक्सवर पोस्ट करत राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. त्यानंतर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात कुठेही पोलिसांसाठी पेट्रोल किंवा डिझेलची कमतरता नाही. सर्व ठिकाणी इंधन उपलब्ध आहे. नागपुरातील एका ठिकाणी पेट्रोल उपलब्ध असतानाही संबंधित पोलिसाने अत्यंत बेजबाबदार उत्तर दिले. त्यामुळे त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

## सोलापुरात ७ दिवस पुरेल एवढेच इंधन शिल्लक

■ सोलापूर

**सोलापूर** शहर आणि जिल्ह्यासाठी येत्या ७ दिवस पुरेल इतकाच इंधनाचा साठा शिल्लक आहे. असे असले तरी पाकणी डेपोत मुंबईतून तेलाचा मोठ्या प्रमाणात सतत इंधनाचा पुरवठा सुरूच आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केले.

जिल्ह्याला प्रती दिवसासाठी पेट्रोल ६२४ लीटर व डिझेल १२४० लीटर इतक्या इंधनाची आवश्यकता भासते. सध्या २६१८१ लीटर पेट्रोल, ४५७७० लिटर डिझेलचा साठा शिल्लक असल्याचीही पुस्ती जिल्हाधिकाऱ्यांनी जोडली. पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घेतली. जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांना व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेण्याचे आदेश दिले होते.

## महागाई व बेरोजगारीविरोधात शरद पवार गटाचे आंदोलन

■ मुंबई

**वाढती** महागाई, बेरोजगारी, इंधनटंचाई आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मंत्रालय परिसरात आंदोलन केले. मंत्रालयाजवळील सिग्नल परिसरात कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करत निदर्शने केली. राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या उपस्थितीत हे आंदोलन पार पडले.

या आंदोलनात पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलकांनी महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न आणि इंधनटंचाईच्या मुद्यांवर सरकारला धारेवर धरले. सरकार सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असून केवळ सत्तेच्या राजकारणात व्यग्र आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरूच ठेवली. काही काळ मंत्रालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी महेबूब शेख यांच्यासह काही आंदोलकांना ताब्यात घेतले. या आंदोलनामुळे परिसरातील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला.

## वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतर करणे स्वस्त झाले

शेतकऱ्यांना दिलासा

■ मुंबई

**कमाल** जमीन धारणा कायद्यांतर्गत (यूएलसी) मिळालेल्या वर्ग- २ च्या जमिनींचे वर्ग -१ मध्ये रुपांतर करण्यासाठी लागणाऱ्या शुल्कात शासनाने मोठी कपात केली आहे. आता संबंधित जमिनीच्या रेडीरेकनर दराच्या २५ ते ३० टक्के नजराणा म्हणून शासनाकडे भरून जमीन मालकी हक्काची करता येणार आहे.

कमाल जमीन धारणा कायद्यानुसार मर्यादेपेक्षा जास्त असलेली जमीन शासनाने ताब्यात घेऊन ती भूमिहीन शेतकरी, माजी सैनिक आणि गरजूंना वाटप केली होती. अशा जमिनी वर्ग -२ म्हणून ओळखल्या जातात. यापूर्वी अशा जमिनींचे व्यवहार करताना रेडीरेकनरमधील दराच्या ५० टक्के रक्कम भरून वर्ग २ कायम ठेवून विक्रीची परवानगी दिली जात होती. आता ही रक्कम २५-३० टक्के कमी केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## ओझर विमानतळाच्या विस्तारित कामाला अखेर अधिकृत मंजुरी

■ लासलगाव

**आगामी** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या ओझर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ५६० कोटी रुपयांच्या भव्य विस्तारीकरण आराखड्याला नागरी विमानवाहतूक महासंचालनालय आणि नागरी विमान सुरक्षा विभागाने अधिकृत मंजुरी दिली आहे.याबाबतचे पत्र मुख्य सुरक्षा अधिकारी, ओझर विमानतळ यांना प्राप्त झाले आहे.

त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ओझर विमानतळाचे विस्तारीकरण केले जाणार आहे. त्यासाठी ५६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.विमानतळ विस्तारीकरणामुळे येथील प्रवासी क्षमतेत तीनपट वाढ होण्याची शक्यता आहे.त्यामुळे विमानतळ विस्तारीकरण बांधकामाचा आराखडा मंजुरीसाठी नागरी विमान उड्डाण विभागाकडे सादर केला होता. या आराखड्यात नवीन ॲप्रॉनचे बांधकाम, विद्यमान ॲप्रॉनचा विस्तार आणि संबंधित नवीन टॅक्सी वेसाठी संकल्पना व आराखडा आदींचा समावेश आहे.

## स्पाइसजेटची अहमदाबाद येथून मुंबई, दिल्लीची विमानसेवा बंद होणार

■ नवी दिल्ली

**कमी** किमतीची विमानसेवा म्हणून ओळखली जाणारी स्पाइसजेट गुजरातमधील महत्त्वाच्या मार्गांवरील उड्डाणे बंद करणार आहे. यामध्ये अहमदाबाद-मुंबई आणि अहमदाबाद-दिल्ली मार्गांचा समावेश असून, कांडला-मुंबई मार्गावरील सेवा आधीच बंद केली आहे. वेळापत्रकाच्या अद्ययावत माहितीनुसार, स्पाइसजेटने अहमदाबाद-मुंबई मार्गावरील अनेक उड्डाणे तसेच अहमदाबाद-दिल्ली मार्गावरील एक सेवा आपल्या बुकिंग सिस्टिममधून काढून टाकली आहे.

## कोकण मतदारसंघ विधानपरिषद निवडणूक कार्यक्रम जाहीर!

■ सिंधुदुर्ग

**कोकण** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो.या मतदारसंघासाठी होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने नुकताच जाहीर केला आहे. यामध्ये १८ मेपासून २५ जूनपर्यंत या तिन्ही संपूर्ण जिल्ह्यात आचारसंहिता लागू केली आहे.

निवडणुकीसाठी २५ मे रोजी अधिसूचना जारी केली जाईल. नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून असेल.२ जून रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होऊन ४ जून पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. निवडणुकीसाठी मतदान गुरुवार १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळेत होईल.मतमोजणी सोमवार २२ जून होऊन संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची तारीख गुरुवार २५ जून असेल.

## मुंबई पालिकेच्या मालकीच्या इमारतींचे 'स्ट्रक्चरल ऑडिट'

पालिका परवानाधारक सल्लागार नेमणार

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या शाळा,रुग्णालये,मार्केट,वॉर्ड कार्यालये आदींसह सर्व इमारतींच्या सुरक्षिततेसाठी पालिका प्रशासनाने व्यापक 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्याचा निर्णय घेतला आहे.यासाठी पालिकेच्या इमारत विभागाकडून परवानाधारक संरचनात्मक सल्लागारांची नियुक्ती केली जाणार आहे.

मुंबईतील अनेक महापालिका इमारती ३० ते ७० वर्षे जुन्या असून त्यांपैकी अनेक इमारतींना मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. विशेषतः पालिकेच्या शाळा,आरोग्य केंद्रे, रुग्णालये आणि विभागीय कार्यालयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर तज्ज्ञ संरचनात्मक सल्लागारांचे स्वतंत्र पॅनल तयार करून इमारतींची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.या सल्लागारांमार्फत इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट, दुरुस्तीचा खर्च, पुनर्बांधणी आराखडे, भूकंपरोधक क्षमता, अग्निसुरक्षा उपाययोजना तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.जुन्या व धोकादायक इमारतींच्या दुरुस्ती, पुनर्वसन आणि नव्या इमारतींच्या बांधकामाला यामुळे गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पंढरपुरात १५ जूनपर्यंत पाद्य-तुळशी पूजा बंद

■ पंढरपूर

**अधिक** महिन्यानिमित्त पंढरपुरात भाविकांची प्रचंड गर्दी होत असून दररोज एक लाखांहून अधिक भाविक श्री विठ्ठलांच्या दर्शनासाठी येत आहेत. भाविकांना सुलभ आणि जलद दर्शन मिळावे यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १५ जूनपर्यंत पाद्य पूजा, तुळशी पूजा तसेच व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

अधिक महिन्यामुळे तसेच उन्हाळी सुट्यांमुळे पंढरपुरात मोठ्या प्रमाणावर गर्दी वाढली आहे. विठूरायाच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांना तब्बल सात ते नऊ तास प्रतीक्षा करावी लागत आहे. वाढती गर्दी आणि उष्णतेमुळे भाविकांना होणारा त्रास लक्षात घेऊन मंदिर समितीने हा निर्णय घेतला आहे.


## ६०५ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक सरपंच! सुप्रीम कोर्टाचा निर्णय

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर जिल्ह्यातील ६०५ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक सरपंच नियुक्ती प्रकरणाला अखेर गती मिळाली आहे. प्रशासक सरपंच नियुक्तीविरोधातील जुन्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींमध्ये नियुक्तीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

जिल्ह्यातील सुमारे ६०५ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक सरपंच नियुक्तीचे काम रखडले होते. या प्रकरणी भाऊसाहेब गोजरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी पार पडली. यामध्ये नियुक्तीला विरोध करण्यात आला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने विरोधातील आदेशाला स्थगिती देत प्रशासनाला दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील रखडलेल्या विकासकामांना गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत बोलताना गोजरे म्हणाले की, आम्ही दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी झाली. ॲडव्होकेट सागर पावणे पाटील यांनी आमचे म्हणणे न्यायालयात मांडले. माननीय सर्वोच्च न्यायालयाने संबंधित आदेशाला स्थगिती दिली आहे. याबद्दल आम्ही न्यायालयाचे आभार मानतो.

# नवाकाळ शब्दकोडे-१६१३



**आडवे शब्द –**

१. अर्थार्जन करणारा ५. भरवशाचे, विश्वास ठेवण्याजोगे, हमखास चांगले १०. मोठे, भव्य ११. ठळक, लगेच नजरेत भरणारे १३. परस्परसंपर्क १४. शंकर, प्रत्येक १५. नवरदेवाची आई १७. बाई , स्त्री १८. भुंग्याचा आवाज १९. शपथ, भाक २०. साडेसातीवाला ग्रह २१. दबाव, बोजा, दडपण २२. मुक्तता २४. असंमती, अस्वीकार २६. सर्वजण २७. चित्त, अंत:करण २८. बुद्धी २९. समाविष्ट ३०. कृत्रिम दंतसंच ३१. सूट ३२. आकर्षण ३३. सुग्रीवाचा भाऊ ३५. चेहरा ३६. संकोच, लाज ३७. फक्त पुस्तकी ज्ञान असलेला, अजिबात व्यवहारज्ञान नसलेला ३८. ढग ३९. ताकीद ४०. देवी ४१. वृद्धी ४३. उद्यान ४४. चंद्र, रजनीनाथ ४६. पुरेसा नसलेला, तोकडा ४७. युद्धाच्या वेळी स्फूर्ती देणारे गीत ४८. लोक ५०. बालसाहित्यातील पंख असलेली नायिका ५१. उसाचा रस आटवण्याची मोठी कढई ५२. समाधान ५३. तोंडपाठ ५५. श्रम, प्रयत्न ५७. निर्जन, भकास, वैराण ५८. समस्येवर काढलेला उपाय ५९. सोने, कनक ६०. महिना ६२. पाषाण ६३. प्रयत्न, धांदल ६५. गुन्ह्याचा संशय ६७. मनोहर ६९. मंजूर ७०. कारल्याची चव ७२. आदराने मस्तक झुकवलेला ७४. रडतखडत, कष्टपूर्वक ७५. कलिका ७७. दयावान ७८. कन्या ८०. खोकल्याची उबळ ८१. पुरुषांचा गळ्यातला दागिना ८२. ग्राम ८३. नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे प्रसिद्ध किल्ला ८६. रंगवून केलेले वर्णन ८९. माळजमीन ९१. जहाल विष ९२. परीट ९३. बायको ९४. सडपातळ, अशक्त

**उभे शब्द –**

१. विठ्ठल रखुमाईपरी आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी, ××× ×× × ××××× (पी. सावळाराम यांनी लिहिलेले आशा भोसले यांच्या आवाजातील जुने प्रसिद्ध भावगीत) २. वस्तू, जिन्नस ३. दृढ, गर्विष्ठ ४. स्मृती ५. निर्दालन ६. तांबडी झाक ७. गुणज्ञ, गुणांची कदर असलेला ८. पिठल्याचा कोरडा प्रकार ९. पुष्ट १२. रक्तवाहिनी १४. यज्ञ १६. देवाची स्तुती, प्रार्थना, स्तोत्र १९. कोंबड्याचे पहाटेचे ओरडणे २२. अमृत २३. कडक उन्हाचा त्रास २५. कावळा २६अ. तख्त, सिंहासन २७. स्वार्थी २८. कृपा ३३. पुन्हापुन्हा ३४. मुळापासून ३५. औरंगजेबाचे संबोधन ३९. पायपीट ४०. डोळ्यात टाकण्याचे औषध ४२. नाजूक ४४. फुलातील पराग ४५. कर्मकांडवादी, सनातनी ४६. अटळ ४७. सुखरूप ४९. ठाऊक ५१. तनू, देह ५२. शेंडीभोवतीचा घेरा ५३. दरिद्री ५४. गोड बोलून गळ्यात पडणारा ५५. तात्पुरता बांधलेला लाकडी पूल ५६. मनातले घडाघडा न बोलणारा ५८. अतिशय अशक्त माणसाच्या तब्येतीचे वर्णन ६१. आक्षेप ६४. सतत बोलत राहाणे ६६. तुच्छ, हलके ६८. शिक्का ७१. भिवविणारे ७३. जास्त किंमतीचे, न परवडणारे ७४. अंदाज ७४अ. शेळी ७५. कौशल्य ७६. पांढरी मोठी सुपारी ७७. विश्वासघात ७९. मेल्यावर पापी माणसे इथे जातात ८१. फालतू दर्जाचे, न टिकणारे ८३. वनराज ८४. नांगर ८५. साठवणीसाठी झाकणाचे पात्र ८७. भाविक ८८. बारा वर्षे ९०. रडकथा

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १६११ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. ऋण ३. हसतमुख ७. कनात ९. वाचक ११. वारकरी १२. हलवाई १४. गोम १५. सिद्धटेक १६. दारा १७. दगदग १९. कुभांड २०. बस २३. पक्षी २४. चाकोरीबद्ध २७. बंगालचा उपसागर ३२. नारा ३३. जादू ३४. वसाहत ३८. लवकर ४०. प्रयत्न ४१. मशक ४२. कलीयुग ४३. समिधा ४५. तावदान ४७. जोम ४८. नमुनेदार ५०. खट्टू ५१. सरस ५२. लढा ५३. निब ५६. सहज ५७. खाई ५८. सायास ६०. आशादायक ६१. यजमान ६२. मैना ६३. माज ६४. सापळा ६६. नशीब ६७. वजन ७१. कावा ७२. भवताल ७३. कोळसा ७४. अंध ७५. कुचंबणा ७६. तापट ७८. जगरहाटी ८१. सीमित ८४. नृत्यांगना ८५. जबाबदारी ८८. सरकी ८९. सत्य ९०. संभावित ९१. किळस ९२. लुच्चा ९३. आबाळ ९४. नटराज

**उभे शब्द :** १. ऋद्धिसिद्धीचा नायक सुखदायक भक्तासी २. फरक ३. हरीदास ४. तह ५. मुलगा ६. खवा ८. नारद ९. वामकुक्षी १०. करंडक ११. वाटेकरी १३. ईद १८. गडप २०. बद्ध २१. लेंगा २२. वेचा २३. परवशता २५. कोरा २६. बडा २७. बंदूक २८. लग्न २९. उभय ३०. साडी ३१. मोह ३३. जावळ ३५. साकव ३६. तहान ३७. आयुध ३९. रसमलई ४०. प्रधान ४४. गोदाम ४५अ. दाणे ४६. गरज ४९. मुखिया ५१. सहनशीलता ५३. निशा ५४. बदाम ५५. पोकळ वासा ५६. समानता ५७. खानावळ ५८. साज ५९. ससा ६०. आळा ६३. मान ६५. पर्णकुटी ६८. जसा ६९. अधर ७०. दबदबा ७३. कोट ७४. अंगना ७७. पड ७८. जगदंबा ७९. हातभार ८०. मैदा ८२. मिसळ ८३. तरस ८४. नृत्य ८५. जतन ८६. बहिरा ८७. रीघ ८९. सच्चा

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी सरकारी पक्षाचे लेखी म्हणणे सादर

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील बहुचर्चित मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी आज बीडच्या विशेष मकोका न्यायालयात पार पडली. या प्रकरणाची सुनावणी घेणाऱ्या न्यायाधीशांची बदली झाल्यानंतर नव्याने नियुक्त करण्यात आलेले न्यायमूर्ती जे. आर. पुलाते यांच्यासमोर आजपासून खटल्याचे कामकाज सुरू झाले.



आजच्या सुनावणी-दरम्यान विष्णू चाटे यांनी दाखल केलेल्या जीपीए (जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी) संदर्भात सरकारी पक्षाने आपले म्हणणे न्यायालयात सादर केले. तसेच आरोपी जयराम चाटे याच्या जामीन अर्जावरही सरकारी पक्षाकडून लेखी म्हणणे दाखल करण्यात आले. लॅपटॉपच्या क्लोन कॉपी संदर्भातही न्यायालयात चर्चा झाली. लॅपटॉपची क्लोन कॉपी मागवल्यानंतर पेन ड्राईव्हमध्ये देण्यात आलेले पुरावे आणि मूळ लॅपटॉपमधील माहिती एकच आहे का, याची न्यायालयाने पडताळणी करावी, अशी तोंडी मागणी बचाव पक्षाकडून करण्यात आली. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ जून रोजी होणार आहे.

सुनावणीनंतर संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी आरोपींच्या वर्तनावर नाराजी व्यक्त केली. सर्व आरोपी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. आरोपी कोर्टासमोर कॉलर उडवत होते. त्यांना कसलाही पश्चाताप नसल्याचे त्यांच्या वागणुकीतून दिसून आले. आजची त्यांची वागणूक न्यायाधीशांसह आम्ही सर्वांनी पाहिली, असा आरोप धनंजय देशमुख यांनी केला.

## नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. शिरुरेंना अटक

पान १ वरून

आले. प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे यांचा शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. मागील काही वर्षांपासून ते या नेटवर्कच्या संपर्कात असल्याचा संशयही सीबीआयला आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणी अंबाजोगाई येथील दोन विद्यार्थ्यांचीही सीबीआयकडून चौकशी सुरू असून, तपासासाठी त्यांचा मोबाईल फोन ताब्यात घेण्यात आला आहे. या मोबाईलमधील कॉल रेकॉर्ड, चॅट्स आणि डिजिटल व्यवहारांची तपासणी करून पेपरफुटी प्रकरणातील आणखी धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. आणखी काही पालकांवर कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सीबीआय चौकशीत असे समोर आले आहे की, टोळीने पालकांची आर्थिक स्थिती पाहून ५ ते ५० लाख रुपयांपर्यंत पेपर विकला. उर्वरित रकमेच्या हमीसाठी कोरे चेक आणि विद्यार्थ्यांची कागदपत्रे ठेवली जात होती.

दरम्यान, मनिषा मांढरे, मनिषा वाघमारे आणि धनंजय लोखंडे या तिघांना पुण्यात आणण्यात आले आहे. पुण्यातील सीबीआय कार्यालयात तिघांची समोरासमोर बसवून कसून चौकशी केली जात आहे. तपास यंत्रणा त्यांच्याकडून पेपरफुटीच्या नेटवर्कबाबत माहिती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. शुभम खैरनारची सीबीआय रिमांड ५ दिवसांनी वाढवण्यात आली. कोर्टाने मनीषा मांढरे आणि मोटेगावकर यांच्या स्वाक्षरीचे नमुने घेण्याचीही परवानगी दिली आहे. तर दिल्लीतील राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने आरोपी मांगीलाल खटीक, विकास बिवाल, दिनेश बिवाल, यश यादव आणि धनंजय लोखंडे यांना २ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली.

## गरीबनगर तोडमोहीम सुरूच

पान १ वरून

पोलिसांनी मोठी कारवाई करत १६ जणांना अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात आली. सर्व आरोपींवर दंगल, सरकारी कामात अडथळा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच १०० ते १५० जणांविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हाही नोंदवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आज या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या कारवाईवर टीका करत काँग्रेस नेते हुसेन दलवाई म्हणाले की, गरीब नगरमधील नागरिकांना पर्यायी जागा द्यावी. जेव्हा ही वस्ती उभी राहत होती, तेव्हा प्रशासन काय करत होते? तेव्हा तुम्ही कारवाई का नाही केली? तुम्ही ३० वर्षांआधीच कारवाई करायला हवी होती. दोन मजली घरे तयार होईपर्यंत तुम्ही काय करत होता?

## वरळी, वांद्रे, अंधेरी समूह पुनर्विकास सगळीकडे अदानी, अंबानींची बोली

पान १ वरून

इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी सहभाग नोंदविला आहे. त्याचबरोबर एस. व्ही. पी. नगर, अंधेरी (पश्चिम) प्रकल्पासाठी रिलायन्स ४आयआर रिअल्टी डेव्हलपमेंट लिमिटेड, अदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड आणि हनुरा रिअल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांनी बोली सादर केल्या आहेत. प्राप्त झालेल्या सर्व तांत्रिक निविदांची म्हाडामार्फत संबंधित विकासकांचा पूर्वानुभव, आर्थिक क्षमता व इतर पात्रता निकषांच्या आधारे छाननी करण्यात येणार आहे. तांत्रिक छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र निविदादारांच्या आर्थिक बोली उघडण्यात येतील व त्यानंतर सर्वाधिक स्पर्धात्मक प्रस्ताव सादर करणाऱ्या विकासकाची निवड केली जाईल. म्हाडाने मुंबईतील सुमारे ९२५ एकर क्षेत्रावर ११ महत्त्वाचे पुनर्विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. येथे ८० हजार ७४७ रहिवासी आहेत.

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
Municipal Bank Bhavan, 245, P. D'mello Road, Fort, Mumbai –400001.
**Tel.** 91-22-2261 3814/ 91-22-22717800/858/852
**Email** : mcb.itcell@mcbmumbai.com

**Tenders are invited for "Sealed quotations from Authorized Service Providers for Two Years Subscription & Support of Bank's Firewall."**

The Municipal Co-Operative Bank Ltd, Mumbai invites request for proposal **Sealed quotations from Authorized Service Providers for Two Years Subscription & Support of Bank's Firewall**

Tender to be downloaded from the Bank's following Website: **www.mcb.bank.in**
Eligible vendor will be selected based on the RFP response received by the bank.

Tender to be submitted to the Bank on or before 01st Jun 2026 upto 5.00PM.

**Place: Mumbai** **Sd/-**
**Date:22/05/2026** **General Manager**

## 'कॉकरोच जनता पार्टी'चे अकाऊंट भारतात बंद केले

### अभिजित दीपके कोण?



अभिजित दीपके 'कॉकरोच जनता पार्टी'चा संस्थापक असून, तो मूळचा महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी या गावचा आहे. त्याने पुण्यात ब्रॉडकास्ट जर्नलिझमचे शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या तो अमेरिकेत बोस्टन विद्यापीठात जनसंपर्क (पब्लिक रिलेशन्स) विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. अभिजित दीपके हा पॉलिटिकल कम्युनिकेशन स्ट्रॅटेजिस्ट म्हणूनही काम करतो. राजकीय नॅरेटिव्ह तयार करणे, सार्वजनिक संवाद घडवणे आणि डिजिटल माध्यमांद्वारे जनमतावर प्रभाव टाकणे या क्षेत्रात त्याचा अभ्यास आणि अनुभव आहे. सोशल मीडिया, विशेषत: मीम्स आणि डिजिटल कॅम्पेनच्या माध्यमातून लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यात त्याचा विशेष हातखंडा आहे. २०२० ते २०२३ या काळात त्याने आम आदमी पार्टीच्या सोशल मीडिया टीममध्ये स्वयंसेवक म्हणून शिक्षण व आरोग्य या क्षेत्रात काम केले. दिल्ली विधानसभा निवडणूक २०२० दरम्यान त्याने मीम-आधारित डिजिटल प्रचारात सक्रिय भूमिका बजावली होती. त्या काळात 'देश के गद्दारों को, गोली मारो सालों को' या घोषणेला प्रत्युत्तर म्हणून 'देश के गवारों को, स्कूल भेजो सारों को' हा सोशल मीडिया कॅम्पेन राबवण्यात आला होता. त्यामध्येही त्याचा सहभाग होता. या डिजिटल मोहिमेला तरुण मतदारांमध्ये मोठा प्रतिसाद मिळाल्याचे मानले जाते.

पान १ वरून

सर्व मजकूर हटवण्यात आला. या कारवाईमागील अधिकृत कारण अद्याप समोर आलेले नाही. अभिजित दीपके यांनी आरोप केला की, आधी त्याच्या अकाऊंटला हॅक करण्याचे प्रयत्न झाले, वारंवार पासवर्ड रिसेटचे संदेश येत होते आणि ते अयशस्वी झाल्यानंतर अकाऊंट थेट बंद करण्यात आले. आम्ही काही चुकीचे बोललो नव्हतो. आम्ही फक्त प्रश्न विचारत होतो. आम्ही नीट प्रकरणी शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा मागत होतो. मग आमचे अकाऊंट का बंद केले? आमची लोकप्रियता वाढत होती. त्यामुळे हे पाऊल उचलले गेले. दरम्यान, याआधी हिंदुस्थान भाऊचे देखील सोशल मीडिया बंद केले होते. कोरोना काळात दहावीची परीक्षा ऑनलाईन घेतली जाणार होती. मात्र उद्धव ठाकरे सरकारने ऑफलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. याविरुद्ध हिंदुस्तान भाऊने सोशल मीडियावर आवाहन केले आणि विद्यार्थी प्रतिसाद देत रस्त्यावर उतरले. नंतर भाऊला पोलिसांनी ताब्यात घेतले आणि हे आंदोलन थंडावले.

'कॉकरोच जनता पार्टी' केवळ एक इंटरनेट ट्रेंड म्हणून राहणारा आहे की, ती कालांतराने एक मोठी राजकीय चळवळ बनेल, पक्षात रुपांतर होईल हे काळच ठरवेल.

**शीर्षक तपासणीची सूचना**

सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित केले जाते की, माझ्या ग्राहकाकडून मिळालेल्या सूचनांनुसार, मी खालील व्यक्तींच्या हक्काची (शीर्षकाची) चौकशी करीत आहे : (१) श्री. रविंदर ग्रोवर, (२) श्री. पवन ग्रोवर, (३) सौ. नीना ग्रोवर, (४) सौ. सीमा ग्रोवर, जे कार्यालय क्रमांक बी - ३ (ज्याला कार्यालय क्रमांक ३ म्हणून ओळखले जाते), ज्याचे बांधकाम क्षेत्र सुमारे ५२७.५ चौरस मीटर (कोनाडयांसह), हे ८व्या मजल्यावर, 'ट्रेड स्टार' या इमारतीच्या 'ब' विंग मध्ये, मथुरादास वस्सनजी रस्ता, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९ येथे स्थित आहे, तसेच ट्रेड स्टार प्रिमायसेस को- ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या १० पूर्ण भरलेल्या शेअर्सचा (यापुढे सामूहिकपणे 'सदर मालमत्ता' म्हणून उल्लेख), ज्याचे तपशीलवार वर्णन खालील अनुसूचीत केले आहे, या मालमत्तेचे मालक आहेत.

ज्या सर्व व्यक्तिंना सदर मालमत्तेसंदर्भात किंवा तिच्या कोणत्याही भागांसंदर्भात, विक्रि, हस्तांतरण, देवाणघेवाण, निर्देशन, तारण, भार, देणगी, विश्वस्तता, करार, वारसा, दावा, ताबा, भागवटा, भाडेपट्टा, भाडेकरार, उप-भाडेकरार, देखभाल, उप-पट्टा, परवाना, तारण हक्क, वसीयतद्वारे हस्तांतरण, जड भार किंवा कोणत्या ही करार, लेखी दस्ताऐवज, हस्तांतरणपत्र, दस्तऐवज, वसीयत, वारसा योजना, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, खटला, डिक्रि किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश, करार /संविदा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, स्वारस्य, अधिकार, आक्षेप आणि / किंवा मागणी असेल, त्यांना याद्वारे विनंती केली जाते की, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर, लेखी स्वरूपात तसेच त्यासोबत सत्य प्रत जोडून, आणि नोटरीद्वारे प्रमाणित केलेल्या दस्तऐवजी पुराव्यांसह, आपले म्हणणे मला (अधोहस्ताक्षर्यास) कळवावे. जर कोणताही दावा केला गेला नाही तर सदर मालमत्तेसंदर्भातील असा कथित दाव्या किंवा स्वारस्याचा कोणताही आधार न घेता किंवा त्याकडे दुर्लक्ष करून व्यवहार केला जाऊ शकतो, आणि असा दावा सर्व हेतूंसाठी व प्रयोजनांसाठी त्यागला गेला असे समजले जाईल व तो माझ्या ग्राहकास बंधनकारक राहणार नाही.

**वरील अनुसूची**

व्यावसायिक जागा, कार्यालय क्रमांक बी-३ (ज्याला कार्यालय क्रमांक ३ म्हणून ओळखले जाते) ज्याचे बांधकाम क्षेत्र सुमारे ५२७.५ चौरस मीटर (कोनाडयांसह), हे ८व्या मजल्यावर, 'ट्रेड स्टार' या इमारतीच्या 'ब' विंग मध्ये, मथुरादास वस्सनजी रस्ता, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९ येथे स्थित असून, ही जागा सी.टी.एस. क्रमांक २४०, २४०/१, २४०/२, गाव कोंडिविटा, तालुका अंधेरी, जिल्हा नोंदणी मुंबई उपनगर अंतर्गतच्या भूखंडावर बांधलेली आहे; तसेच भूतलावरील ७ (सात) मोटार वाहन पार्किंग जागा, ज्यांचे अनुक्रमांक ३१, ३२, ३७ आणि ३८ आहेत, आणि तळघर पार्किंगमधील अनुक्रमांक ९५, ९६ आणि ९७ आहेत, आणि ट्रेड स्टार प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या भांडवलामधील प्रत्येकी दर्शनी मूल्या रूपये १००/- (शंभर रूपये) असलेले १० (दहा) पूर्ण भरलेले शेअर्स, ज्यांचे विशिष्ट क्रमांक ४९१ ते ५०० (दोन्हीसह), शेअर प्रमाणपत्र क्रमांक ०३२, दिनांक १ मे २०१९ रोजी जारी.

सही/-
उमंग शाह (ॲडव्होकेट - हायकोर्ट)
तारीख : २२ मे २०२६, शुक्रवार ९१५, टोपीवाला सेंटर, ९ वा मजला, ऑफ एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई - ४०००१०४

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN TO PUBLIC AT LARGE that my client **M/s. Syncom Formulations (India) Limited** (CIN : L24239MH1988PLC047759) a company incorporated under Companies Act, 1956 having registered address at 7, Niraj Industrial Estate, Off Mahakali Caves Road Andheri (East), Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400093 intends to purchase, commercial property more particularly mentioned in the schedule hereunder from HDFC Bank Limited, **(the "Property")** (CIN : L65920MH1994PLC080618) a company incorporated under Companies Act, 1956 having registered office at Sandoz House, Dr. Annie Beasant Road, Worli, Mumbai - 400 018.

The subject commercial Property viz. entire 3rd Floor, comprising of Unit No. 1 & 2 admeasuring about 980 Sq. Mtr. carpet area and Unit No. 3 & 4 admeasuring about 980 Sq. Mtr. carpet area along with total 20 car parking allotments in the Building known as Trade Star situated at Village Kondivita, Mathuradas Vassanji Road, Andheri (East), on land bearing Survey No. 65 Hissa No. 4 (pt), Hissa No. 5 (pt), Survey No. 65(A) Hissa No. 1 (pt), Hissa No. 2, Hissa No. 4 (pt), Hissa No. 7 (pt), Survey No. 66, Hissa No. 2 (pt) that were consolidated into C.T.S No. 240, 240/1, 240/2 are presently possessed and occupied by HDFC Bank Limited., under Agreement For Sale dated 28.06.2003 bearing Registration No. BDR4-04664-2003 and under Agreement For Sale dated 01.06.2004 bearing Registration No. BDR4-3775-2004.

All person(s) having any share, right, title, benefit, interest, claim, objections & demands in respect of the said Property or any part thereof by way of sale, exchange, assignment, mortgage, charge, gift, trust, monument, inheritance, occupation, possession, tenancy, sub-tenancy, leave and license, caretaker basis, lease, sub-lease, lien, maintenance, easement, release through any agreement, conveyance, writing, bequest, succession, family arrangement, settlement, litigation, decree, order of any court of law, contract / agreement, or encumbrance or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with documentary proof/sufficient evidence **within 14 days** from the date of publication hereof failing which or as otherwise the sale transaction shall be completed without any reference or regards to any such claim or interest which shall be deemed to have been waived for all purposes.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Commercial premise being entire 3rd Floor, comprising of Unit No. 1 & 2 admeasuring about 980 Sq. Mtr. carpet area and Unit No. 3 & 4 admeasuring about 980 Sq. Mtr. carpet area along with total 20 car parking allotments in the Building known as Trade Star situated at Village Kondivita, Mathuradas Vassanji Road, Andheri (East), on land bearing Survey No. 65 Hissa No. 4 (pt), Hissa No. 5 (pt), Survey No. 65(A) Hissa No. 1 (pt), Hissa No. 2, Hissa No. 4 (pt), Hissa No. 7 (pt), Survey No. 66, Hissa No. 2 (pt) that were consolidated into C.T.S No. 240, 240/1, 240/2, Dist. Mumbai and within the registration district of Mumbai.


Sd/-
**Date : 22.05.2026** **PARAG S. MISHRA (Advocate High Court)**
503, Vaishali Shopping Center, S. V. Road, Malad (West), Mumbai - 64
Mobile No. 9869126163.

## रेल्वे भरतीसाठी आलेल्या परप्रांतीयांना मारहाण! मात्र राज ठाकरे निर्दोष मुक्त

पान १ वरून

त्या सीडीला कोणतीही कायदेशीर किंमत देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. याशिवाय, परप्रांतीय विद्यार्थी परीक्षेसाठी आले होते, हा दावा देखील सिद्ध करता आला नाही. या सर्व कारणांमुळे न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले.

मागील सुनावणीदरम्यान १३ मे रोजी राज ठाकरे न्यायालयात हजर झाले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या विरोधातील सर्व आरोप फेटाळून लावत, माझा या गुन्ह्याशी काहीही संबंध नाही, आंदोलनावेळी मी नाशिकला होतो, असे सांगितले होते.



आजच्या अंतिम निकालात न्यायालयानेही पुराव्याअभावी त्यांची निर्दोष मुक्तता केली. या निर्णयामुळे राज ठाकरे यांना मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे.

२००८ मध्ये कल्याण रेल्वे स्थानकावर रेल्वे भरती परीक्षेसाठी आलेल्या परप्रांतीय उमेदवारांवर हल्ला केल्या प्रकरणी राज ठाकरेंसह मनसेच्या आठ कार्यकर्त्यांवर गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यापैकी एका आरोपीचा खटला सुरू असतानाच मृत्यू झाला. तब्बल अठरा वर्षांनंतर या प्रकरणाचा अंतिम निकाल लागला. त्यात राज ठाकरेंसह सगळे निर्दोष ठरले.

**SBI**
**स्टेट बँक ऑफ इंडिया**
**क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय, नवी मुंबई,**
जी–१०१ ते जी–१०६, सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाशेजारी, बेलापुर रेल्वे स्थानक संकुल, टॉवर क्र. ३, १ला मजला, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई – ४०० ६१४

**सार्वजनिक सूचना**

**विषय: शाखा कार्यवाहय एसबीआय वाशी सेक्टर १७ शाखेकडे (१०३३०) हस्तांतरित करणे**
हे सर्व ग्राहक आणि भागधारकांना सूचित करण्यासाठी आहे की, आमच्या विद्यमान कार्यालयाचे तातडीने पुनर्रचनाच्या दृष्टीने, आमच्या शाखेचे कार्य अंतर्गत तात्पुरते दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित केले जाईल. सर्व सेवा, लॉकर्सच्या कार्यव्यतिरिक्त, खाली दिलेल्या नवीन शाखा पत्त्यावरुन अखंडपणे प्रदान केल्या जात राहील. लॉकर ऑपरेशन्स जे. के. चेंबर्स च्या विद्यमान शाखेतील परिसरात सुरु राहतील.
**नवीन पत्ता: स्टेट बँक ऑफ इंडिया, वाशी सेक्टर – १७ शाखा (१०३३०), ग्राउंड फ्लोर, अंरेजा बिल्डिंग, प्लॉट क्र. ७१, सेक्टर – १७, वाशी, नवी मुंबई – ४००७०६. प्रभावी तारीख : २५.०५.२०२६**
लॉकर सुविधांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांनो, कृपया लॉकर प्रवेशासाठी विद्यमान शाखेच्या ठिकाणी भेट देत राहा.
**कठीण प्रश्न किंवा अधिक माहितीसाठी कृपया आमच्याशी संपर्क साधा:**
१. अंकुर गुप्ता | शाखा व्यवस्थापक | ८४४७३५३७२२
२. अनुपमा देशपांडे | सेवा व्यवस्थापक | ९८६७३७७५११
**झालेल्या कोणत्याही गैरसोयीबददल आम्ही दिलगीर आहोत आणि तुमच्या समजुतीची व सहकार्याची कदर करतो.**

**शाखा व्यवस्थापक**
**स्टेट बँक ऑफ इंडिया**
**जे. के. चेंबर्स शाखा 70665**

**जाहिर नोटिस**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950, कलम 47 अन्वये खालील नमुद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणे बाबत**
**अर्ज क्रमांक: 20/2025**
**न्यासाचे नाव: "गगन माथुर ट्रस्ट"**
**न्यास नोंदणी क्र.: E-7041 (मुंबई)**

**1.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चे कलम 47 अन्वये दाखल अर्ज क्रमांक 20/2025 मधील अर्ज निशाणी क्रमांक 1 वर मा. धर्मादाय सह आयुक्त–2, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक 06.03.2026 रोजी आदेश पारीत केला आहे. सदर आदेशानुसार संबंधित हितसंबंध लोकाना व आम जनतेला या जाहिर नोटीसद्वारे कलविण्यात येते की, **"गगन माथुर ट्रस्ट"** नोंदणी क्रं. **E-7041 (मुंबई)** या न्यासात विश्वस्तांची नेमणुक करणेकरीता अर्जदार यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

**2.** अर्जदराने नि. क्र. 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्यास नोंदणीच्या वेली न्यासाचे कामकाज पहाण्यासाठी खालील व्यक्ती होते.
1. अर्जुन बुलचंदानी
2. श्रीमती शैला बुलचंदानी
3. श्री. रतन हिंगोरानी
4. श्री फरदून मर्चेट

**3.** अर्जदार यांनी खालील विश्वस्तांची न्यासाच्या विश्वस्तपदी नेनणूक करण्यासाठी विनंती केला आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.
1. संजय अर्जुन बुलचंदानी
2. श्रीमती वंदना अर्जुन बुलचंदानी
3. श्री रवी बुलचंदानी
4. श्री आश्विन बुलचंदानी

**4.** सदरवे प्रकरण उपरोक्त नमुद व्यक्तींची न्यासात विश्वस्तपदी नेमणुक करण्यासाठी मा. धर्मादाय **सह आयुक्त–2,** महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे समोर **दिनांक 19.06.2026** रोजी **दुपारी 12.00** वाजता ठेवण्यात आले आहे. तरी वरील नमुद पदनियुक्ती वाबत कोणाला काही **हरकती/आक्षेप** किवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी स्वत: सदर नोटीस जाहीर झाल्याच्या दिनांकपासून 30 दिवसपर्यत या कार्यालयात हजर राहुन लेखी हरकत किंवा म्हणणे मांडावे. जर कोणीही हजर न राहिल्यास आपणास काहीही हरकत/म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन योग्य तो कायेदेशीर निर्णय धेण्यान येईल याची आपण सर्वानी नोंद ध्यावी.

ही नोटीस माझे सही व मा. धर्मादाय आयुक्त. महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्यानिशी आज दिनांक 15.05.2026 रोजी दिली.

आपली विश्वासू, (सीमा केणी),
अधीक्षक (न्याय),
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# टेट्रापॅकमधून मद्यविक्री! सुप्रीम कोर्टाची केंद्राला नोटीस



**नवी दिल्ली -** शीतपेयांसारख्या दिसणाऱ्या टेट्रापॅकमधून मद्यविक्री करण्यावर बंदी घालावी, अशी मागणी करणारी एक जनहित याचिका नुकतीच सर्वोच्च न्यायालयात सुनावणीस आली. टेट्रापॅकमधून मद्यविक्री केल्याने अल्पवयीन मुलांमध्ये मद्यपानाचे आकर्षण वाढू शकते, असा याचिकाकर्त्याचा दावा आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठावर सुनावणी झाली. त्याप्रसंगी खंडपीठाने केंद्र सरकार, अबकारी कर विभाग आणि सर्व राज्य सरकारांना नोटीस बजावली असून, यावर भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

## ठाण्यात गावदेवी भाजी मार्केटला आग
## अग्निशमन अधिकारी, सुरक्षारक्षकाचा मृत्यू

■ ठाणे

**ठाण्यातील** नौपाडा परिसरातील गावदेवी भाजी मार्केटला आज पहाटे आग लागून ठाणे महानगरपालिकेचे सुरक्षारक्षक काळू शंकर गाडेकर आणि अग्निशमन विभागाचे स्थानक अधिकारी सागर शिंदे यांचा मृत्यू झाला. तर अग्निशमन दलाचे कर्मचारी सुजित पष्टे आणि समीर जाधव हे जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गोखले रोडवरील गावदेवी प्रभाग समिती कार्यालयाजवळ असलेल्या मार्केटमध्ये पहाटे साडेतीनच्या सुमारास अचानक



आग भडकली. काही क्षणातच संपूर्ण परिसर धुराने वेढला गेला. आपत्ती व्यवस्थापन कक्षाला पहाटे ३.४३ वाजता आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. आग स्वरूपाची असल्याने घटनास्थळी अग्निशमन दलाच्या पाच गाड्या, दोन रेस्क्यू वाहने, जम्बो वॉटर टँकर, पाण्याचे टँकर तसेच आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान तैनात करण्यात आले.

## यावर्षी ८८ टक्केच पाऊस
## फडणवीसांची माहिती

■ मुंबई

**खरीप** पिकाची आढावा बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले की, यावर्षी ८८ टक्केच पाऊस होणार आहे. अल निनोचा परिणाम होणार आहे. पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यात जास्त लक्ष द्यावे लागेल.

फडणवीस पुढे म्हणाले की जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळू शकेल यावर आम्ही विशेष भर दिला आहे. कोणत्याही शेतकऱ्याची सीबीलसाठी अडवणूक करायची नाही असे आदेश दिले आहेत. बँकांसोबत आम्ही कर्ज माफीच्या संदर्भात चर्चा केली आहे. आपल्याला कल्पना आहे की महाराष्ट्रात विशेषतः सगळ्यात मोठा हंगाम हा खरीपाचा असतो, त्यानंतर रब्बी आणि उन्हाळी पीक घेतात. या वर्षीच्या खरीप हंगामावर अल निनोचे संकट आहे.

## सहा वर्षीय चिमुकलीचे मृत्यू प्रकरण
## दीनानाथ रुग्णालयाला पालिकेची नोटीस

■ पुणे

**पुण्यातील** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डोळ्याच्या शस्त्रक्रियेदरम्यान सहा वर्षीय प्रियांशी बगाडेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची महापालिकेच्या आरोग्य विभागाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी रुग्णालय प्रशासनाला नोटीस बजावण्यात आली आहे. संबंधित घटनेचा सविस्तर अहवाल, केसपेपर व सर्व वैद्यकीय नोंदी २४ तासांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी रुग्णालय प्रशासनाला ही नोटीस



पाठवली आहे. प्रियांशी हिच्या डोळ्यावरील शस्त्रक्रियेसाठी तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, शस्त्रक्रियेदरम्यान तिचा मृत्यू झाल्याचा आरोप झाल्यानंतर या घटनेची चौकशी सुरू करण्यात आली. महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या नोटिशीत मुंबई नर्सिंग होम अधिनियम तसेच राज्य शासनाच्या १४ जानेवारी २०२१ च्या अधिसूचनेतील नियमांचे पालन करणे रुग्णालयांसाठी बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे. उपचार प्रक्रियेतील सर्व तपशील, शस्त्रक्रियेविषयीची माहिती, वैद्यकीय नोंदी व संबंधित कागदपत्रे तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पुरंदर विमानतळ भूसंपादनाची बनावट पोस्ट! अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

■ पुणे

**पुरंदर** तालुक्यातील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाबाबत बनावट आदेश सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विमानतळासाठीची जागा तांत्रिकदृष्ट्या अयोग्य ठरल्याने भूसंपादन प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आल्याचा दावा या बनावट पोस्टमध्ये करण्यात आला होता.

उपजिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाने हा बनावट आदेश प्रसारित करण्यात आला. त्यामध्ये पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची जागा तांत्रिकदृष्ट्या अयोग्य ठरल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया स्थगित करण्यात आल्याचा दावा पोस्टमध्ये करण्यात आला. या पोस्टमुळे परिसरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने तातडीने याची दखल घेत हा आदेश बनावट असल्याचे स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही केले. प्रस्तावित विमानतळ प्रकल्पासाठी सध्या सात गावांमध्ये भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे.

## एचडीएफसी बँकेत कर्मचाऱ्यांसाठी २ दिवस वर्क फ्रॉम होमचा प्रस्ताव

■ नवी दिल्ली

**एचडीएफसी** बँकेने काही निवडक कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यात दोन दिवस घरून काम करण्याचा (वर्क फ्रॉम होम) पर्याय लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन घेतला आहे. हा निर्णय सुरुवातीला चाचणी स्वरूपात सुमारे ३० दिवसांसाठी राबवला जाण्याची शक्यता आहे. बँकेकडून हा उपक्रम यशस्वी ठरल्यास तो पुढील काळात विस्तारित केला जाऊ शकतो.

बँक सुमारे ३० दिवसांच्या चाचणी कालावधीत आठवड्यातून दोन दिवस घरून काम करण्याची परवानगी देणार आहे. यामध्ये मुख्यतः आयटी,





वित्त, ऑपरेशन्स, जोखीम व्यवस्थापन आणि अनुपालन यांसारख्या शाखांतील कर्मचारी सहभागी असतील. बँकेचा उद्देश कामकाजात लवचिकता आणणे आणि ग्राहकांशी थेट संपर्क नसलेल्या टीम्सना संकरित (हायब्रीड) पद्धतीचा लाभ देणे हा आहे. मात्र शाखा आणि ग्राहक सेवा देणारे कर्मचारी नेहमीप्रमाणे कार्यालयातूनच काम करतील.

ही योजना यशस्वी ठरल्यास भविष्यात ती अधिक काळासाठी वाढवली जाण्याची शक्यता आहे. अंतर्गत बैठका शक्य तितक्या ऑनलाईन पद्धतीने घेण्याचाही विचार सुरू आहे.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाला १५० कोटी रुपयांचा निधी वितरीत

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी १५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील तरुणांना स्वयंरोजगार आणि उद्योगासाठी मोठा आधार मिळणार असल्याचे मानले जात आहे. राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडून यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. पहिल्या टप्प्यात १५० कोटी रुपयांचा निधी महामंडळाला दिला आहे. या निधीचा वापर विविध रोजगार आणि स्वयंरोजगार योजनांसाठी केला जाणार आहे. यापूर्वी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या महामंडळासाठी एकूण ७५० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी आधीच ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित केला होता. आता नव्याने १५० कोटी रुपयांना मंजुरी देण्यात आल्याने एकूण निधी वितरणाला गती मिळाली आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाचा इशारा दिला असतानाच सरकारने हा निर्णय घेतल्याने त्याला राजकीय आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

## इबोला व्हायरस! परदेशातून येणाऱ्या प्रवाशांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी

■ नवी दिल्ली

**भारत** सरकारने इबोला विषाणूग्रस्त देशांतून येणाऱ्या प्रवाशांसाठी सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. ताप किंवा इतर लक्षणे दिसल्यास प्रवाशांनी तत्काळ विमानतळावरील आरोग्य कक्षाला माहिती द्यावी. तसेच भारतात आल्यानंतर २१ दिवस स्वतःच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

भारत सरकारच्या आरोग्य सेवा महासंचालनालय यांनी इबोला विषाणूबाबत महत्त्वाची आरोग्यविषयक ‘ॲडव्हायझरी’ जारी केली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दक्षिण सुदान, युगांडा, काँगो या देशांना ‘हाय-

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

रिस्क’ म्हणजेच उच्च-जोखीम देशांच्या श्रेणीत ठेवले आहे. त्यामुळे या देशांतून येणाऱ्या प्रवाशांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे भारत सरकाराकडून सांगण्यात आले आहे. दिल्ली विमानतळावर विमानतळ आरोग्य संस्थेकडून यासंदर्भातील माहिती देण्यात आली आहे. प्रवाशांनी ताप, अशक्तपणा, थकवा, डोकेदुखी व स्नायूंमध्ये वेदना यांसारख्या लक्षणांकडे लक्ष द्यावे. याशिवाय उलट्या, जुलाब, घशात खवखव आणि रक्तस्त्राव हीदेखील इबोलाची लक्षणे असू शकतात. अशी लक्षणे दिसल्यास प्रवाशांनी तत्काळ विमानतळ अधिकाऱ्यांना माहिती द्यावी, असे सांगितले आहे.

## पश्चिम बंगालमध्ये मदरशांत ‘वंदे मातरम’ गाणे अनिवार्य

■ कोलकाता


**पश्चिम** बंगाल सरकारने राज्यातील सर्व मदरशांमध्ये ‘वंदे मातरम’ गाणे अनिवार्य करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अल्पसंख्याक व्यवहार आणि मदरसा शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व सरकारी मॉडेल, अनुदानित तसेच विनाअनुदानित मान्यताप्राप्त मदरशांना हा आदेश तत्काळ लागू केला आहे.

आता प्रत्येक मदरशामध्ये वर्ग सुरू होण्यापूर्वी सकाळच्या प्रार्थना सभेत ‘वंदे मातरम’ गायन बंधनकारक असेल. यापूर्वी मदरशांमध्ये राष्ट्रगान ‘जन गण मन’ तसेच कवी गुलाम मुस्तफा यांचे ‘अनंत असीम प्रेममय तुमी’ हे बंगाली गीत गायले जात होते. सरकारने स्पष्ट केले आहे की, या आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर संबंधित मदरशांना त्याचा अहवाल विभागाकडे सादर करावा लागणार आहे. याशिवाय, १३ मे रोजीच राज्यातील सर्व सरकारी आणि अनुदानित शाळांमध्येही सकाळच्या सत्रात ‘वंदे मातरम’ अनिवार्य करण्यात आले होते, ज्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे.

## अदानी समूह जयप्रकाश पॉवरचा हिस्सा ४,१९४ कोटींना विकत घेणार

■ नवी दिल्ली

**अदानी** पॉवरने जयप्रकाश असोसिएट्सकडून जयप्रकाश पॉवर व्हेंचर्सचा २४ टक्के हिस्सा आणि इतर मालमत्ता सुमारे ४,१९३.५९ कोटी रुपयांना खरेदी करण्यासाठी अंतिम करार केले आहेत. अदानी पॉवरने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीनुसार जयप्रकाश असोसिएट्सकडे असलेल्या जयप्रकाश पॉवर व्हेंचर्सच्या २४ टक्के शेअर्सच्या अधिग्रहणासाठी शेअर खरेदी करारावर स्वाक्षरी



केली आहे. याशिवाय, कंपनीने चुर्क (उत्तर प्रदेश) येथील १८० मेगावॅट वीज प्रकल्प आणि संबंधित मालमत्ता खरेदी करण्यासाठी व्यवसाय हस्तांतरण करार केला आहे. यात प्रयागराज पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेडमधील ११.४९ टक्के हिस्साही समाविष्ट आहे.

जयप्रकाश पॉवर व्हेंचर्समधील २४ टक्के हिस्स्यासाठी २,९९३.६० कोटी रुपये दिले जाणार आहेत. तर चुर्क येथील १८० मेगावॅट तापीय प्रकल्प आणि इतर संबंधित मालमत्तांसाठी १,२०० कोटी दिले जातील. अदानी पॉवरने १९ मार्च रोजी शेअर बाजाराला कळवले होते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी मंजूर केलेल्या समाधान योजनेअंतर्गत कंपनीच्या बनण्यामध्ये त्यांनी रस दर्शवला आहे.

## ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती बँक संचालकांना हजर राहण्याचा आदेश

■ मुरबाड

**ठाणे-पालघर** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कथित गैरकारभार, नियमबाह्य नोकरभरती व आर्थिक अनियमितता प्रकरणी सतिश वाळकू मोहपे यांनी दाखल केलेल्या याचिकेची गंभीर दखल घेत मुंबई हायकोर्टने बँकेच्या १४ संचालकांना समन्स बजावले आहेत. या सर्व संचालकांना २९ जूनपर्यंत संचालक मंडळाच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास सक्त मनाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

सतिश मोहपे यांनी दाखल केलेल्या याचिकेत २०२५-२६ मधील १६५ पदांची नोकरभरती, मर्जीतील कर्मचाऱ्यांच्या बढत्या, कार्यक्षेत्राबाहेरील कोट्यवधींचे कर्जवाटप आणि खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारी असूनही सहकार विभागाने याची दखल घेतली नसल्याने न्यायालयात धाव घेतल्याचे सतिश मोहपे यांनी सांगितले.

न्यायालयाने या प्रकरणात संबंधित संचालकांना प्रतिवादी करण्यास परवानगी देत सहकार विभाग, आयबीपीएस तसेच नोकरभरती प्रक्रिया राबविणाऱ्या वर्कवेल कंपनीला नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

## उत्तर प्रदेशच्या बांदाचा पारा ४८.२ अंशांवर



■ लखनौ

**राजस्थानच्या** चुरू आणि जैसलमेरला मागे टाकत उत्तर प्रदेशातील बांदा जिल्हा आता देशातील नवे ‘हीट आयर्लंड’ ठरला आहे. मे महिन्याच्या मध्यातच येथील तापमान तब्बल ४८.२ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने उष्माघाताच्या भीतीपोटी नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. सकाळी १० वाजल्यानंतर बाजारपेठांत शुकशुकाट पसरत असून, अघोषित ‘लॉकडाऊन’सारखी स्थिती निर्माण होत आहे.

उष्णतेमुळे बांदा जिल्ह्यातील जनजीवन पूर्णपणे कोलमडले आहे. पोटाची

**सकाळी १० वाजताच ‘लॉकडाऊन’**

खळगी भरण्यासाठी मजूर आणि व्यावसायिक सकाळी ६ वाजल्यापासूनच कामाला लागत असून, सकाळी ८ वाजताच आपल्या घरी परतत आहेत. तीव्र उन्हामुळे शेतकरी आता दिवसाऐवजी रात्रीच्या वेळी एलईडी लावून शेतात काम करत आहेत. दुपारच्या वेळेत काम करणे अशक्य असल्याने मजुरांना त्यांच्या हक्काच्या ४० टक्के मजुरीवर पाणी सोडावे लागत आहे. इतकेच नाही तर वाढत्या लोडशेडिंग आणि उष्णतेमुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये, म्हणून वीज विभागाचे कर्मचारी तब्बल ४४ सब स्टेशन्समधील १,३०० हून अधिक ट्रान्स्फॉर्मरवर सतत पाण्याचा मारा करून ते थंड ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत.

## रिलायन्सच्या एआय डेटा सेंटरसाठी आंध्र प्रदेशकडून ८०० एकर जमीन

■ अमरावती

**आंध्र प्रदेश** सरकारने रिलायन्स इंडस्ट्रीजला विजयानगरम जिल्ह्यात ८०० हून अधिक एकर जमीन २५ टक्के सवलतीच्या दरात देण्यास मंजुरी दिली. ही जमीन १ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीच्या गिगा-स्केल एआय डेटा सेंटर (एआयडीसी) आणि केबल लँडिंग स्टेशन (सीएलएस) उभारण्यासाठी देण्यात येणार आहे. आयटी सचिव भास्कर कटमनेनी यांनी आंध्र प्रदेश इंडस्ट्रियल अँड इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन व विजयानगरम जिल्हा प्रशासनाला केबल लँडिंग स्टेशनसाठी योग्य अतिरिक्त जमीन शोधण्याचे निर्देश दिले. सरकारी आदेशात कटमनेनी म्हणाले की, सरकारने विजयानगरम जिल्ह्यातील ८५४.९७ एकर जमीन रिलायन्स इंडस्ट्रीजला २५ टक्के सवलतीच्या दरात देण्यास मंजुरी दिली आहे. ही जमीन गिगा-स्केल आंध्र प्रदेश इंडस्ट्रियल अँड इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन आणि सीएलएस स्थापनेसाठी देण्यात येत असून प्रस्तावित एकूण गुंतवणूक १.०८ लाख कोटी रुपये आहे. सरकारी आदेशानुसार या मेगा प्रकल्पासाठी इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशनने विजयानगरम जिल्ह्यातील पोलीपल्ली, भोगापूरम वेस्ट आणि भोगापूरम ईस्ट गावांत जमीन निश्चित केली आहे. याशिवाय, राज्य सरकारने १८.४ लाख कोटींच्या रुपयाच्या या समूहासाठी विशेष स्वरूपातील आर्थिक आणि बिगर-आर्थिक प्रोत्साहने, सवलती, अनुदाने, परतावे, शुल्कमाफी आणि इतर विविध सुविधा मंजूर केल्या आहेत.

## यंदा वारीतील माऊलींच्या रथासाठी रानवडे कुटुंबाच्या बैलजोडीला मान

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी वारी सोहळ्यातील रथासाठी यंदा आळंदीतील रानवडे घराण्याच्या बैलजोडीची निवड करण्यात आली आहे. माऊलींच्या रथासाठी बैलजोडी जुंपण्याचा मान परंपरेने कुऱ्हाडे, रानवडे, भोसले, वहिले, घुंडरे आणि वरखडे या अलंकापुरीतील ग्रामस्थांना दिला जातो.**





■ आळंदी

**यंदाचा** आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळा ८ जुलै रोजी आळंदीहून पंढरपूरकडे रवाना होणार आहे. या पार्श्वभूमीवर बैलजोडी निवड समितीची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत प्रगतशील शेतकरी हर्षवर्धन रानवडे आणि तुळशीराम रानवडे यांच्या बैलजोडीला रथ ओढण्याचा मान देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. बैठकीस बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शिवाजीराव रानवडे, विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामदास भोसले आणि रमेश कुऱ्हाडे उपस्थित होते. दरम्यान, बैलजोडीचा मान जाहीर झाल्यानंतर समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांच्या हस्ते हर्षवर्धन रानवडे व तुळशीराम रानवडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी रानवडे कुटुंबियांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, माऊलींच्या रथासाठी आमच्या बैलजोडीची निवड होणे हा आमच्या कुटुंबासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भाग्याचा क्षण आहे.

## खेळाच्या मैदानावर ‘प्रदर्शन केंद्र’ उभारण्याचा पालिकेचा प्रस्ताव

■ मुंबई

**वांद्रे** रेक्लेमेशन येथील एका मोठ्या खेळाच्या मैदानाचा ताबा घेऊन त्या ठिकाणी ‘एक्झिबिशन सेंटर’ म्हणजेच ‘प्रदर्शन केंद्र’ उभारण्याचा प्रस्ताव समोर आला आहे. हा प्रस्ताव पालिका प्रशासन २७ मे रोजी होणाऱ्या सुधार समितीच्या बैठकीत सादर केला जाणार आहे. परंतु या ठाकरे शिवसेनेने या प्रस्तावाला जोरदार विरोध दर्शविला आहे.

त्यामुळे मुंबईत खेळाचे मैदान वाचवायचे की प्रदर्शन केंद्र उभारायचे, यावरून पालिका प्रशासन आणि विरोधकांमध्ये नवा वाद पेटण्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिकेच्या सुधार समितीसमोर वांद्रे रेक्लेमेशन येथील तब्बल ८,४५० चौ.मी. जागेवरील क्रीडांगणाचे आरक्षण

**वांद्रेत आरक्षण बदलणार**

**ठाकरे शिवसेनेचा विरोध**

हटवून, त्या ठिकाणी प्रदर्शन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी आणला आहे. सध्या ही जागा टर्फ आणि फुटबॉल मैदानाच्या रूपात वापरली जात असून, ती म्हाडाच्या मालकीची आहे.

## चंदीगडमधील शाळा, रेल्वेमार्ग बॉम्बने उडवण्याची धमकी

■ चंदीगड

**चंदीगडमधील** अनेक नामांकित शाळा, हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांचे कार्यालय आणि अंबाला-दिल्ली रेल्वेमार्ग बॉम्बस्फोट घडवून उडवण्याची धमकी अज्ञात व्यक्तीने ईमेलद्वारे दिल्याने खळबळ उडाली आहे. या धमकीमुळे संपूर्ण प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या ईमेलमध्ये ६ जून २०२६ पर्यंत शाळांमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्याचा इशारा देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अंबाला-दिल्ली या महत्त्वाच्या रेल्वेमार्गावर आयईडी स्फोट घडवण्याची धमकीही देण्यात आली आहे. त्यामुळे रेल्वे सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाल्या आहेत. धमकीची माहिती मिळताच चंदीगड पोलीस, बॉम्ब शोधक आणि निकामी पथक, सायबर क्राईम विभाग तसेच इतर सुरक्षा यंत्रणा तातडीने सक्रिय झाल्या.